MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष तेवीसावे / अंक ५ / मे २०२२

## संपादकीय

### दुर्मीळ चित्रांचे प्रदर्शन
### प्राच्य विद्या अभ्यास संस्थेचा अभिनव उपक्रम

ठाणे शहरात १९८३ शाली डॉक्टर विजय बेडेकर यांच्या पुढाकाराने प्राच्य विद्या अभ्यास संस्थेची स्थापना करण्यात आली. जुन्या काळातील वस्तूंचे आणि हस्तलिखितांचे जतन करण्याच्या उद्देशाने या संस्थेने काम सुरू केले. ठाणे आणि आजूबाजूच्या परिसरात ज्या ज्या वस्तू आढळल्या त्या एकत्र आणून तिथे ठेवल्या. संस्थेचे हे कार्य जेव्हा लोकांना कळले तेव्हा लोकांनी देखील आपला मदतीचा हात पुढे केला. कुठे इमारत बांधण्यासाठी खोदकाम करताना किंवा रस्ता रूंद करताना जुन्या मूर्त्या किंवा वस्तू आढळल्या तर लोक स्वतःहोऊन संस्थेकडे आणून देत असत. वस्तू आणून देणे शक्य नसेल तर ती सापडली असल्याची सूचना संस्थेला देत असत. त्यानुसार तिथं जाऊन वस्तू ताब्यात घेण्यात आल्या. अशा पद्धतीने अनेक पुराणवस्तूंचा संग्रह या संस्थेत करण्यात आला. पुराणवस्तूबरोबरच हस्तलिखिताचा संग्रह करण्याचे प्रयत्न देखील संस्थेने केले. सुरुवातीला ओळखीच्या लोकांकडून काही हस्तलिखिते जमा करण्यात आली. काही वर्षांनंतर मात्र अनेक पुस्तकप्रेमी लोकांनी आपल्या जवळचा संग्रह संस्थेला दिला. अशा पद्धतीने अनेक पुराणवस्तू आणि दुर्मीळ अशी हस्तलिखिते आजच्या घडीला प्राच्यविद्या अभ्यास संस्थेकडे आहेत. विशेष महत्त्वाची बाब अशी की, या वस्तू सांभाळून ठेवण्यासाठी जी जागा लागते ती ठाणे महानगरपालिकेने उपलब्ध करून दिली आहे. प्राच्य विद्या अभ्यास संस्थेचा वस्तूसंग्रह आणि वाचनालय हा ठाणे शहरातील एक महत्त्वाचा ठेवा आहे. याचा उपयोग प्राच्य विद्येचा अभ्यास करणारे अनेक विद्यार्थी आणि संशोधक करीत असतात.

सुमारे दोन वर्षे आपण करोना काळात घालविले. या अवधीत फारशी कामे करता आली नाहीत. परंतु जसजसा करोनाचा प्रभाव कमी झाला तसतसा शैक्षणिक कामाला वेग आला. याचाच उपयोग करून प्राच्य विद्या अभ्यास

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

संस्थेने काही दुर्मीळ चित्रांचे प्रदर्शन आयोजित करायचे ठरविले. त्यासाठी त्यांनी निवड केली ते राजा रविवर्मा यांच्या चित्रांची. ज्या ज्या मार्गांनी या चित्रकाराच्या कलाकृती मिळतील त्या त्या मार्गांनी त्या मिळविण्यात आल्या. पन्नासहून अधिक चित्रांचा संग्रह लवकरच तयार झाला. या सर्व चित्रांचे सुंदर प्रदर्शन या संस्थेत आयोजित करण्यात आले होते. राजा रविवर्मा यांच्या जन्मदिनी म्हणजे २९ एप्रिलला त्याची सुरुवात झाली. मुळात १५ दिवसांसाठी आयोजित केलेल्या या प्रदर्शनाला मिळालेल्या प्रतिसाद पाहून आणखी पंधरा दिवसांची मुदत वाढवून देण्यात आली. एका संपूर्ण मजल्यावर मोठ्या सभागृहात हे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. चित्रे पॅनलवर पद्धतशीरपणे लावलेली आहेत. त्याचबरोबर मध्ये मध्ये संग्रहालयात असलेल्या काही प्राचीन वस्तू ठेवलेल्या आहेत. या दोघांच्या एकत्रिकरणाने प्रदर्शन खरोखरच सुंदर आणि प्रभावी झाले आहे.

केरळच्या राज घराण्यात १८४८ साली जन्मलेल्या राजा रविवर्मा यांच्या चित्रांची शैली काही वेगळीच होती. त्यांनी काढलेली चित्रे जिवंत वाटत. भारतीय पुराण कथातील व्यक्तीरेखा यांची चित्रे काढण्यात त्यांचा हातखंडा होता. तसे पाहता ते केरळ राज्यात लहानाचे मोठे झाले. परंतु त्यांना महाराष्ट्रातील नऊवारी साडीचे मोठे महत्त्व जाणवायचे. स्त्रिचे सौंदर्य नऊवारी साडीत अतिशय चांगले खुलून दिसते असे त्यांचे मत होते. त्यांच्या चित्रांची प्रदर्शने अनेक ठिकाणी भरविण्यात आली. त्यांचा काळात भारतावर इंग्रजांचे राज्य होते. त्यांनी देखील राजा रविवर्मा यांच्या कलेचे कौतुक केले. परदेशातून येणाऱ्या काही महत्त्वपूर्ण व्यक्तींची चित्रे त्यांनी राजा रविवर्मा यांच्याकडून काढून घेतली. हाताने चित्र काढणे एक कठीण काम आहे. त्यामुळे एकसारखी चित्रे काढता येत नाहीत. त्यामुळे ब्रशने काढलेल्या चित्रांची संख्या खूपच कमी असते. तिचा फारसा प्रसार होत नाही. ही मर्यादा टाळण्यासाठी राजा रविवर्मा यांनी महाराष्ट्रातील लोणावळा शहरात एक छापखाना टाकला. यात त्यांनी काढलेली चित्रे छापून मोठ्या प्रमाणावर उपलब्ध केली जाऊ लागली. त्यामुळे त्यांच्या चित्रांचा प्रसार केवळ देशातच नाही तर देशाबाहेर देखील झाला. त्याची नोंद घेऊन ब्रिटिश सरकारने त्यांना पारितोषिक दिले.

राजा रविवर्मा यांच्या चित्रप्रदर्शनाला कसा प्रतिसाद मिळेल यासंबंधी आयोजक साशंक होते. परंतु ठाणेकरांनी या संधीचा चांगला उपयोग करून घेतला असे दिसते. ठाण्याच्या आर्टस् कॉलेजचे विद्यार्थी मोठ्या संख्येने तिथे येऊन गेले. त्याबरोबरच काही चित्रकारांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. या मंडळींनी चित्र कसे पहावे या बाबींवर मार्गदर्शन केले. काही चित्रकारांनी तर विद्यार्थ्यांपुढे पोर्ट्रेटच काढून दाखवले. या सगळ्याचा विद्यार्थ्यांना चांगलाच फायदा झाला. या प्रदर्शनाला मिळालेल्या प्रतिसाद बघता अशा प्रकारचे प्रदर्शन भविष्यात आयोजित करण्याची प्राच्य विद्या अभ्यास संस्थेची योजना आहे.

(पृष्ठ क्र. ३ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष तेवीसावे/अंक ५/मे २०२२

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २६ वे/अंक ११ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजनेतून व्यक्तिमत्त्व विकास | डॉ. मोझेस जे. कोलेट | ३ |
| ३) | तलाव ते टॉवर | अुत्तम भास्कर जोशी | ५ |
| ४) | वैशाख पौर्णिमेचे माहात्म्य | नरेंद्र गोळे | ७ |
| ५) | निका टर्बिना : रशियन कवयित्री | डॉ. आनंद कुलकर्णी | १० |
| ६) | किती जवळ, तरीही किती दूर..... | चन्द्रशेखर टिळक | १२ |
| ७) | कै. कृष्णास्वामी भट - जीवन प्रकाश | ओंकार विजयकुमार शेटे | १६ |
| ८) | व्रत (भाग-१) | किरण वसंत पुरंदरे | २० |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजनेतून व्यक्तिमत्त्व विकास

*एन.सी.सी.-'राष्ट्रीय छात्रसेना' व एन.एन.एस.- 'राष्ट्रीय सेवा योजना' हे दोन्ही दल आपल्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाकरिता व आयुष्य घडवण्याकरिता अत्यंत उपयुक्त आहेत. याबद्दलची माहिती लेखकाने या लेखात मांडली आहे - संपादक*

एन.सी.सी.- 'राष्ट्रीय छात्रसेना' व एन.एन.एस.- 'राष्ट्रीय सेवा योजना' हे दोन्ही दल महाविद्यालयांमध्ये तत्पर आहेत. दोन्ही दलांमध्ये मुले व मुली आपल्या आवडीनुसार संमेलित होऊ शकतात व आपले आयुष्य सकारात्मक घडवू शकतात. मित्रांनो, हे दोन्ही दल आपल्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाकरिता व आयुष्य घडवण्याकरिता अत्यंत उपयुक्त आहेत.

एन. सी.सी. व एन.एस. एस. मध्ये विद्यार्थी आपल्या स्वेच्छेने सेवेची नोंदणी करून सामील होतात. युवा उद्याची पिढी आहे व राष्ट्राचा भार सांभाळण्याकरिता सक्षम व सशक्त बनण्याच्या हेतूने दोन्ही दल विद्यापीठ व राज्य, तसेच केंद्र शासनाशी प्रशासनाकरिता जुडलेली आहेत. युवा पिढी कार्यक्षम रितीने घडविणे हे लक्षात ठेवून दोन्ही दलांच्या योजना ठरविण्यात आलेल्या आहेत. आपल्या सुवर्ण देशात दोन्ही दलं सुरुवातीपासून मुले व मुली, सर्वांना समान संधी देत आहेत. एन.सी.सी. संघटनेमध्ये दरवर्षी साडे-तेरा लक्ष युवा प्रतिवर्षी सहाभागी होत असतात व यामुळेच आपल्या या संघटनेस जगातील सर्वात मोठी शिस्तबद्ध व गणवेशधारी युवा संघटनेचा मान मिळाला आहे. संपूर्ण देशातील छात्र एकाच गणवेशाने एकत्रित झाले आहेत व नारा आहे 'एकता व अनुशासन.'

विद्यार्थ्यांची एन.सी.सी. मधील वटचाल एन.सी.सी. एनरॉलमेंटने होते. शाळा व महाविद्यालयांतून ही संघटना कार्यरत आहे. शाळांमधील छात्र दोन वर्षांच्या अभ्यासक्रमातून एन.सी.सी.(अ) चे प्रमाणपत्र प्राप्त करतात. महाविद्यालयात तीन वर्षांच्या अभ्यासक्रमामध्ये दुसऱ्या वर्षी एन.सी.सी.(ब) प्रमाणपत्र व तिसऱ्या वर्ष पूर्ण करून एन.सी.सी.(सी) प्रमाणपत्र या परीक्षा असतात. महाविद्यालयात एन.सी.सी.मध्ये प्रवेश घेण्याकरिता शाळेत एन.सी.सी. निवडणे बंधनकारक नसते. विद्यार्थी महाविद्यालय प्रणाली मध्ये एनरॉल असणे एवढेच आवश्यक आहे.

सी.प्रमाणपत्र यशस्वीरित्या व अव्वलदर्जाने पार केल्यानंतर सैन्यदलात अधिकारी म्हणून थेट प्रवेश करण्याचा मार्ग खुला होतो व असे खूप सारे छात्र सैन्यात अधिकारी म्हणून उत्तमरित्या कार्य बजावत आहेत. तसेच बरेच शिबिरे मुलामुलीं करिता एन.सी.सी.मध्ये उपलब्ध आहेत. कॅम्प प्राथमिकरित्या प्रादेशिक स्तरावर, राज्य स्तरावर व राष्ट्रीय स्तरावर व त्यापुढे आंतरराष्ट्रीय स्तरावर असतात. प्रादेशिक शिबिरांमध्ये वार्षिक प्रशिक्षण शिबिरे राज्य व राष्ट्रीय स्तरावरील शिबिरांसाठी निवड शिबिरे, समाजसेवा शिबिरे, ही सर्व येतात. शिबिरांमध्ये विद्यार्थी कोणताही भेदभाव न बाळगता एकत्र राहण्यास शिकतात ज्यामधून राष्ट्र घडविण्याच्या महत्त्वाचे कार्याचे बीज मनात बिंबवण्यात येते. राज्य शिबिरांमध्ये रायफल शुटींग शिबिर, राष्ट्रीय स्तरावरील प्रजासत्ताक शिबिरासाठी राज्यस्तरीय निवड शिबिरे, लिडरशीप शिबिरे, राज्या मधून राष्ट्रीय स्तरावरील शिबिरांकरिता छात्रांची निवड केली जाते. तसेच प्रजासत्ताक दिन शिबिरांमधून यशस्वीरित्या परतलेल्या तुकडीकरिता पोर्स्ट आरडीसी

शिबिरे आयोजित केली जातात. राष्ट्रीय शिबिरांमध्ये बीएलसी, मूलभूत नेतृत्त्व शिबिर, आरडीसी प्रजासत्ताक दिन शिबिरे, राष्ट्रीय एकात्मता शिबिरे आणि राष्ट्रीय रायफल शुटींग कार्यक्रम. प्रजासत्ताक दिन शिबिरांमधून संरक्षण मंत्री, पंतप्रधान, राष्ट्रपती या सर्व मान्यवरांना प्रत्यक्ष भेटण्याची विद्यार्थ्यांना संधी मिळते हा संपूर्ण अनुभव फार मोहित करणारा असतो. राजपथ वर २६ जानेवारी परेडमध्ये संचलनामध्ये झालेल्या छात्र संपूर्णरित्या बदलून जातो व सकारात्मक रित्या घडवला जातो. राष्ट्रीय शिबिरे स्तरावर उत्तम कार्य बजावणारे छात्रांची आंतरराष्ट्रीय युवा देवाणघेवाण कार्यक्रमांकरिता निवड केली जाते व अनेक देशांना भेट देण्याची संधी उत्पन्न होते. सैन्यदलातील सर्व उपक्रम एन.सी.सी.मध्ये युवांकरिता उपलब्ध आहेत जसे सैन्य संलग्नक शिबिरे, समुद्र संलग्नक शिबिरे, हवाईदल संलग्नक शिबिरे, रायफल शुटींग व नेमबाजी, बोट ओढणे, ग्लायडिंग इ. साहसी शिबिरे मध्ये, ट्रेकिंग शिबिरे, स्लीदरींग शिबिर, घोडस्वारी, सायकलिंग, कायकिंग गिर्यारोहान, पार्वता रोहन शिबिरे नौकानयन शिबिरे, पॅरासेलिंग शिबिरे व बरेच सारे शिबिरे वा संधीची पर्यावणी उपलब्ध आहे. या सर्व विविध शिबिरांमध्ये भाग घेतल्याने युवांच्या आत्मविश्वासात कमालीची वाढ होते. व्यक्तिमत्त्वामध्ये अमुलाग्र व सकारात्मक बदल घडून येतात या व्यतिरिक्त समाजसेवा, राष्ट्रसेवा, वृक्षरोपण, स्वच्छता मोहीम, रक्तदान, पल्स पोलिओ मोहीम, कोविड लसीकरण शिबिर, पुनित सागर अभियान, गणेश विसर्जना निमित्त गर्दीचे नियंत्रण निवडणूक प्रक्रियेत मदत, विविध राष्ट्रीय दिन निमित्त जसे मतदार दिना निमित्त, एडस प्रतिबंधक दिन, राष्ट्र सुरक्षा व रास्ते सुरक्षा पंधरवडा, ग्राहकदिन, तंबाखू व आमली पदार्थ निषेध दिन व मोहिमे अंतर्गत व अशा विविध दिनांच्या अनुषंगाने त्या त्या दिनाचे महत्त्व व त्याचे नागरिकांमध्ये जागरूकता करून या सर्व मोहिमांचा राष्ट्र उभारणीमध्ये मोलाचा वाटा आहे. नेत्रदान, अवयव दान व हुंडा विरोधी मोहिमेत सुद्धा एन.सी.सी.अग्रेसर आहे. दैनदिन प्रशिक्षणा व्यतिरिक्त या सर्व प्रक्रियामधून छात्र विविधरितीने बहरून निघतात व त्यांचे व्यक्तिमत्त्व निखरते व सर्वांगीण विकास झालेला दिसून येतो. सर्वात प्रथम शिकवले व शरीरात बिंबवलेले एन.सी.सी. गीत 'हम सब भारतीय है,' हे कायम विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मतेची आठवण करून देत रहाते. सूक्ष्म नजरेने पहाता, आपल्या महाविद्यालयीन जीवनात तीन वर्षाचा अतिरिक्त एन.सी.सी. अभ्यासक्रम पूर्ण केलेला विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत बरेच पुढे गेलेला दिसून येतो.

एन.सी.सी. प्रमाणेच एन.एस.एस. राष्ट्रीय सेवा योजना ही आखिल भारतीय स्तरावरील संघटना आपली युवापिढी सक्षम बनविण्याकरिता कार्यरत आहे. विद्यार्थी, विद्यार्थिनींचा महाविद्यालयातील वर्षापैकी दोन वर्ष सामाजिक सेवा करून त्यातून बरेच सन्मान, समाधान तसेच प्रगतीशील हेतू साध्य होतात मुख्यत्वे व्यक्तिमत्त्व विकास व आत्मविश्वासात वृद्धी हे ध्येय साध्य होत असत एन.एस.एस. मध्ये सुद्धा राष्ट्र व युवा घडवण्या व्यतिरिक्त स्वच्छता मोहिमेतून राष्ट्रसेवा, रक्तदान शिबिरे, अन्नदान, विविध मोहिमा जसे ई-वेस्ट गोळा करून त्याची शास्त्रोक्त विल्हेवाट, जुने कपडे गोळा करून त्यांचे गरजूंना वितरण, धान्य वितरण, आपत्तीग्रस्ताना मदत, वृक्षारोपण, विविध बाबींबद्दल जनजागृती, शासनाच्या सामान्यासाठी असलेल्या विविध योजनांबाबत जनजागृती, व त्या मध्ये सहभागी होऊन प्रशासनास मदत, विविध दिन साजरे करून त्या माध्यमातून जनजागृती, असे बरेच सारे उपक्रम राबविले जातात ज्यामधून एन.एस.एस. स्वयंसेवकांच्या आत्मविश्वासामध्ये व सकारात्मक दृष्टीकोनामध्ये प्रचंड वृद्धी झाल्यावाचून राहात नाही. एन.एस.एस. चे गीत 'उठे राष्ट्र के लिये'

(पृष्ठ क्र.१९ वर)

# तलाव ते टॉवर

*''तलाव ते टॉवर'' कॉफी टेबल पुस्तक दिनांक ३० एप्रिल २०२२ रोजी प्रकाशित झाले. या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा व मान्यवरांशी झालेला मुक्त संवाद या विषयी लेखकाने आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे – संपादक*

''तलाव ते टॉवर'' कॉफी टेबल पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आणि मान्यवरांशी मुक्त संवाद.

दिनांक ३० एप्रिल २०२२. स्थळ टीप टॉप प्लाझा ठाणे.

वेळ सकाळी साडे-अकरा वाजता (सुरुवात साडे-बारा वाजता झाली.)

प्रथम तलाव ते टॉवर

टॉवरचा इंग्रजी शब्दकोषा प्रमाणे मनोरा अथवा बुरूज असा अर्थ होतो.

मराठी मध्ये टॉवरला ''टावर'' असेच म्हटले जाते व ते राजाबाई टावर प्रमाणे घड्याळाचा टावर किंवा लोखंडी अथवा पोलादाचे कोणत्याही कामाकरता उभा केलेला मोठा उंच खांब अशा अर्थाने घेतले जाते. निमंत्रणपत्रिका वाचल्यानंतर मासुंदा तलाव आणि टॉवर म्हणजे शिवाजी मैदानातील घड्याळाचा टॉवर ज्याच्या तळमजल्यावर मैदानातील स्टेज आहे. मुळात या अर्थाने तलाव ते टावर मध्ये एक वितिचेही अंतर नाही. कारण तलावाच्या जागेतच टॉवर उभा आहे. आता तलाव ते टॉवर मधला तुम्हाला अपेक्षित अर्थ ठाणे हे तलावांचे शहर होते किंवा आहे व पूर्वी फक्त दोन-तीन मजली, भाड्याने देण्याचे निवासी गाळे असलेल्या ''चाळी'' असा होता. त्यातील तलाव तेथेच राहिले.

काही बुजले किंवा बुजवले गेले आणि त्यासमोर मोठ-मोठ्या सदनिका असलेल्या उंचच उंच इमारती उभ्या राहिल्या असा आहे आणि हे स्थित्यंतर होत असताना शहराची किती व कशी प्रगती होत गेली असा आहे असे वाटते. यासाठी जुने ठाणे कसे होते ते आधी समजून घेणे जरूरीचे आहे.

असो. या विषयाला न्याय देण्यासाठी निवेदकाने सर्वांना बोलते करण्यासाठी प्रास्ताविक तर चांगले केले.

कोणत्याही शहराचे स्थित्यंतर होत असताना त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश अपेक्षित आहे. (आपणच बर्लिन शहरात मोकळ्या जागा किती आहेत यावर त्या शहराचे मोठेपण ठरविले जाते असे सांगितले) म्हणजेच बाग-बगिचे, खेळासाठी मैदाने, मोठ-मोठ्या संमेलनांसाठीची वेगळी मैदाने, आपल्याकडचा विचार करताना निरनिराळ्या जाती-जमाती आणि पंथांचे सण-समारंभ याकरता ठेवलेल्या मोकळ्या जागा वगैरे, नाट्यगृहे, चित्रपटगृहे, समारंभासाठी मोठे हॉल, निरनिराळ्या सामाजिक संस्था, सुसज्ज दवाखाने आणि शुश्रूषालये, सुसज्ज वाचनालये, अभ्यासिका, वस्तुसंग्रहालये, कलादालने, महाविद्यालये, संदर्भ ग्रंथालये (निरनिराळे कोषवाङ्मय असलेली ग्रंथालये), बाजारपेठा, क्रीडागृह, व्यायाम शाळा, तरण तलाव, शहरात मोठमोठे रस्ते आणि चौक, देवालये, प्रार्थनास्थळे अशी ही यादी खूप मोठी होईल. पण त्यातल्या एकाही विषयाला एक फक्त सुहास ताईंनी उल्लेख केलेली डॉक्टर विजय बेडेकर यांची 'प्राच्यविद्या अभ्यास संस्था' सोडली तर कोणीही हात घातलेला नाही.

सर्व वक्ते हे ठाण्यात बाहेरून आलेले होते किंवा आहेत.

ज्यांचा जन्म ठाण्यातच झालेला आहे असा एकही समाजसेवक किंवा बुजुर्ग आपणास मिळू शकला नाही याचे आश्चर्य वाटते. त्यामुळे हे सर्व वक्ते विषयाला न्याय देण्यात फारच कमी पडले अशी खंत वाटते. त्यातील प्रत्येकजण आपापल्या क्षेत्रात मोठा आहे. पण त्यांना विषयाच्या गाभ्याला हात घालता आलेला नाही. (मंत्री महोदयांबद्दल मी कोणतेही मत व्यक्त करू शकत नाही, दोघेही त्यांच्या वकुबाप्रमाणे चांगले बोलले असे म्हणावेसे वाटते.) असो. लोकसत्ताचे सर्व कार्यक्रम नेहमीच सुनियोजित असतात त्याप्रमाणे हा कार्यक्रम झाला.

ज्या विशेष गोष्टींचा उल्लेख अपेक्षित होता त्यातील ठाण्यातील टांगे या एकाच विषयाला स्पर्श झाला. पी. सावळाराम यांच्या सारखा कवी-मनाचा माणूस नगराध्यक्ष होतो हे फक्त ठाण्याने पाहिले आहे. आत्ताच्या मासुंदा तलावाचे पाणी कौपिनेश्वराच्या दगडी भिंतीपर्यंत लागत होते. पूर्वी पावसाळ्यात नगर पोलिस स्टेशनच्या मागील भिंतीत जमिनीलगत दोन दरवाजे आहेत त्यातून भरतीच्या वेळी पाणी आत येत असे व असे सहा-सात दरवाचे ठीक-ठिकाणी होते आणि खाडीतील पाण्यातून होडीने त्या बाजूकडे आल्यावर ते दिसत असत. तसेच मिठागरातील मीठ होड्यांतून याच खाडीतून ठाणे पूर्वेकडील धक्क्यांवर उतरविले जात असे. तेथपर्यंत रेल्वेचे मालगाडीचे डबे येण्यासाठी रेल्वेची लाईन टाकलेली होती. प्रभात टॉकीज जवळील पंचमुखी मारुती, वसंत विहारच्या गेट जवळ असलेला स्फटिकाचा मारुती, बाळ राजेश्वरी मंदिर, सिविल हॉस्पिटल आणि त्या समोर असलेले पिंपळपाडा मैदान व त्यातील मारुती, बाल गणपति मंदिर - हे मंदिर चरईमध्ये आहे, घंटाळी मंदिर, योगाचार्य का. बा. सहस्रबुद्धे आणि श्रीकृष्ण व्यवहारे, ठाण्यातील कॉलेजची उणीव भरून काढणारे कै. डॉक्टर वा. ना. बेडेकर, मुकबधिर संस्था, अपंगांसाठी संस्था, बि. जे. हायस्कूल, १९५४-५५ च्या सुमारास प्रभात टॉकिजच्या पाठीमागून ते जांभळी नाका पर्यंत तळे बुजविण्यासाठी भराव करून ठाण्यातील नागरिकांच्या श्रमदानाने बांधलेला शिवाजी पथ. हे काम श्री. म. वा. देसाई यांच्या कारकिर्दीत झाले आहे. पूर्वी ठाण्यामध्ये नोव्हेंबर ते फेब्रुवारी पर्यंत २-४ व्यावसायिक नाटके होत असत. त्यामध्ये ठाणे मराठी ग्रंथ संग्रहालय, हनुमान व्यायाम शाळा, म्हणजेच समर्थ सेवक मंडळ, पॅव्हेलियन म्हणजे सेंट्रल मैदानातील ठाणे स्पोर्टस् क्लब संस्था, यांच्यामार्फत केले जात असत. पहिल्या ग्रंथ संग्रहालयाची स्थापना करणारे सारस्वतकार श्री. वि. ल. भावे, जुन्या विहिरी - सातरहाटी विहीर, ब्रह्मे यांची विहीर, डॉक्टर मादन यांची (कोटस्थाने बंगला) विहीर, एम.आय.डी.सी. मधील विहीर, सहयोग मंदिराचे बाजूला घाणेकर चाळ येथील तलाव (उत्कर्ष मंडळाच्या जागेजवळ), घोडे पाणी पिण्याची विहीर, तेथे असलेला बाबू नालबंद हा घोडे आणि बैलांना नाल ठोकण्याचे काम करत असे आणि त्याने त्याच विहिरीत जीव दिला हे आम्ही प्रत्यक्ष बघितलेले आहे. पारसिकचा बोगदा, पोखरणचा तलाव - येथे करवंद-जांभळे खाण्यास आम्ही लहानपणी जात असू, उथळसरच्या पुढे जाताना सायंकाळी भीती वाटत असे. कापुरबावडी घोडबंदर रोड येथे सर्व भागात जंगल होते आणि आंब्याची झाडे मोठ्या प्रमाणात होती. येथील हापूस आंबा प्रसिद्ध होता. ठाणे जेलमधील फाशीची जागा, चाफेकर बंधूंना फाशी याच ठिकाणी दिली गेली. जन्मठेपेची शिक्षा झालेल्या कैद्यांकरता वेगळी जागा किंवा खिडकी दरवाजा होता. खाडीतील पाण्याच्या दिशेला ही जागा होती. जन्मठेपेच्या कैद्यांना पुन्हा जमीन दिसू नये म्हणून त्यांना याच दरवाजाने डायरेक्ट बोटीत किंवा पडावात उतरवले जात असे. जेल ते अशोक स्तंभ पर्यंत पाण्याची मोठी पाइपलाइन

(पृष्ठ क्र.१५ वर)

# वैशाख पौर्णिमेचे माहात्म्य


*या लेखात वैशाख पौर्णिमेचे माहात्म्य विशद केले आहे - संपादक*

### कूर्मजयंती



ज्या दिवशी भगवान विष्णूंनी कासवाचा (कूर्म) अवतार घेतला त्या दिवसाची आठवण करून देणारा हा दिवस आहे. कूर्म वा 'कच्छप अवतार' हा श्रीविष्णूच्या दशावतारांपैकी दुसरा अवतार मानला जातो. देव आणि दानवांनी अमृतप्राप्तीसाठी क्षीरसागरात मंथन केले होते. मंदार पर्वताची रवी आणि वासुकी नागाची दोरी केली होती. आपापसातले मतभेद विसरून देव-दैत्यांनी मंदार पर्वत जोर लावून उखडला आणि समुद्रात उभा करायचा प्रयत्न केला. परंतु पर्वत पाण्यात बुडायला लागला. शेवटी भगवान विष्णूंनी कासवाचे रूप, म्हणजे कूर्मावतार धारण केला आणि समुद्रात जाऊन मंदार पर्वताला खालून आधार दिला. कूर्माच्या पाठीवर मंदार पर्वताची रवी फिरू लागली आणि समुद्रमंथन शक्य झाले. ही घटना ज्या दिवशी घडली त्या दिवशी म्हणजे वैशाख पौर्णिमेला कूर्म जयंती साजरी होते.

### बुद्ध पौर्णिमा



पुढे वैशाख पौर्णिमेलाच गौतम बुद्ध (जन्मः इसवीसनपूर्व ५६३ वर्षे; निर्वाणः इसवीसनपूर्व ४८३ वर्षे) यांचा जन्म लुम्बिनी येथे झाला. वयाच्या ३५ व्या वर्षी म्हणजेच इसवीसनपूर्व ५२८ वर्षे, बुद्धगया येथील बोधीवृक्षाखाली त्यांना वैशाख पौर्णिमेलाच ज्ञानप्राप्ती झाली होती. तसेच, वयाच्या ८० व्या वर्षी, इसवीसनपूर्व ४८३ वर्षे, वैशाख पौर्णिमेलाच कुशीनगर येथे गौतम बुद्धांचे निर्वाण झाले.

बुद्धजयंती किंवा बुद्ध पौर्णिमा हा बौद्ध धर्मीयांचा सर्वात महत्त्वाचा उत्सव आहे. हा सण जगभरात विशेषतः भारतात वैशाख पौर्णिमेच्या दिवशी साजरा केला जातो. आपल्या मानवतावादी आणि विज्ञानवादी धम्म सिद्धांतांमुळे तथागत बुद्धांना जगातील महापुरुष आणि गुरू मानले जाते. बौद्ध धर्मीयांची मोठ्या प्रमाणावर संख्या असणाऱ्या चीन, जपान, व्हिएतनाम, थायलंड, भारत, म्यानमार, श्रीलंका, सिंगापूर, अमेरिका, कंबोडिया, मलेशिया, नेपाळ, इंडोनेशिया या देशांसह सुमारे १८० देशांतील बौद्ध लोक हा सण उत्साहात साजरा करतात. यातील अनेक देशांत बुद्ध जयंतीची सार्वजनिक सुट्टी

असते. भारतात देखील बुद्ध पौर्णिमेनिमित्त सार्वजनिक सुट्टी असते.

**चार आर्यसत्ये**

प्रथमावस्थेतील बौद्ध धर्म हा अगदी साधा, समजण्यास सोपा, नैतिक तत्त्वांवर भिस्त ठेवणारा; मानवता, करुणा आणि समानता यांचा पुरस्कार करणारा असा होता. या काळात बुद्ध हा असामान्य गुणवत्ता असलेला, पण मानवदेह धारण करणाराच मानला जात होता. या जगात अबाधित सत्ये कोणती आहेत आणि जगाचे रहाटगाडगे कसे चालते, यासबंधीचे ज्ञान त्यांना बोधिवृक्षाखाली प्राप्त झाले. त्यांना प्रथम चार आर्य सत्यांचा साक्षात्कार झाला. त्याआधारे त्यांनी जगास, दुःखनिवारणाचा जो आचारधर्म सांगितला, त्यालाच 'बौद्ध धर्म' असे म्हणतात. ती चार आर्यसत्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. दुःख सर्वत्र पसरलेले आहे.
२. हाव हे सर्व दुःखांचे मूळ आहे.
३. हाव नाहीशी केली तर दुःखही नाहीसे होऊ शकते.
४. हाव नाहीशी करण्याचा मार्गही असलाच पाहिजे.

**भारतातील बुद्ध-जयंतीचा इतिहास**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर (जन्मः १४ एप्रिल १८९१ मृत्यू: ६ डिसेंबर १९५६) यांच्या अध्यक्षतेखाली २ मे १९५० रोजी भारतात पहिली सार्वजनिक बुद्ध जयंती, दिल्ली येथे साजरी झाली. अशाप्रकारे भारतात बुद्ध-जयंती महोत्सवाच्या परंपरेची सुरुवात बाबासाहेब आंबेडकर यांनी केली, म्हणून ते भारतातील सार्वजनिक बुद्ध-जयंती महोत्सवाचे प्रणेते ठरतात. बुद्ध-जयंती दिनी सार्वजनिक सुट्टी असावी ही १९४२ पासूनच मागणी होती. आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळे २७ मे १९५३ रोजी केंद्र सरकारने बुद्ध-जयंतीनिमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर केली.

**बुद्ध हसला**



**डॉ. होमी सेठना**

(२४ ऑगस्ट १९२३, मृत्यूः ५ सप्टेंबर २०१०)

१८ मे १९७४ रोजी, १९७४ सालच्या बुद्ध पौर्णिमेला, भारताने पहिला चाचणी अणुस्फोट केला होता. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी, अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष डॉ. होमी सेठना आणि भाभा अणुसंशोधन केंद्राचे संचालक डॉ. राजा रामण्णा यांच्या नेतृत्वाखाली हा स्फोट करण्यात आला. या घटनेचे वर्णन 'बुद्ध हसला' असे करण्यात आले. या घटनेनंतर सारे जग भारताच्या या अणुसामर्थ्याने विस्मयचकित झाले. आपल्याहून भारताने वरचढ होऊ नये म्हणून अनेक देशांनी भारतास उच्चतम तंत्रज्ञान देणे बंद केले. त्याचा परिणाम होऊन भारत असमर्थच राहील असे त्यांना वाटत होते. मात्र तसे झाले नाही. भारताने स्वबळावर 'महासंगणक (सुपरकॉम्प्युटर)', 'निम्नतापी (क्रायोजनिक)' तंत्रे, 'प्रक्षेपणास्त्रे (मिझाईल्स)', 'भूस्थिर उपग्रह (जिओस्टेशनरी सॅटेलाईटस)' इत्यादी क्षेत्रांत अभूतपूर्व प्रगती स्वबळावरच केली.

**अण्वस्त्र सुसज्जता**



**डॉ. राजगोपाल चिदंबरम**
(जन्मः १२ नोव्हेंबर १९३६, चेन्नई)

१९७४ साली पोखरण येथे चाचणी करण्यात आलेल्या अणुविस्फोटक साधनाकरता अंतर्स्फोटाची पद्धत डॉ. राजगोपाल चिदंबरम यांनीच विकसित केली होती. याकरता त्यांनी, संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेसोबतच्या घट्ट परस्परसमन्वयातून, भाभा अणुसंशोधन केंद्रात धक्कालहरींचे (शॉकवेव्हजचे) संशोधन सुरू केले. १९९८ च्या अणुचाचण्यांकरता त्यांनी अत्यंत सुटसुटीत अंतर्स्फोटक प्रणाली उपयोगात आणली, जिचे रूपांतरण पुढे अण्वस्त्रांत करता आले.

११ मे १९९८ रोजी, १९९८ सालच्या बुद्ध पौर्णिमेला भारताने पुन्हा एकदा चाचणी अणुस्फोट केले. तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी, अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष डॉ. राजगोपाल चिदंबरम आणि भाभा अणुसंशोधन केंद्राचे संचालक डॉ. अनिल काकोडकर यांच्या नेतृत्वाखाली हे स्फोट करण्यात आले. विलक्षण गोपनीयता पाळून हे स्फोट घडवले गेले. या स्फोटांनंतर भारतात काहीही करण्याचे सामर्थ्य आहे, असा विश्वास भारतीय जनमानसात निर्माण झाला.

**अणुस्फोटांचे जादूगार : डॉ. राजगोपाल चिदंबरम**

जादूगार जसे जना भुलवतो शोधून युक्ती नवी
तैसे दंग चिदंबरं करवुनी योजिती साऱ्या कृती ।
झाले स्फोट कळे, नियोजन कधी झाले कुणा ना कळे
झाली पूर्व तयारिही कशी, कुणी काही न संवेदले ।।१।।

धक्का जो बसला जगास सगळे गेले विरोधातही
रोखिल्या रसदा युरेनियमच्या तंत्रे न देती नवी ।
राष्ट्रा लागत ते इथेच घडुनी संशोध नेला पुढे
केले सज्ज स्वराष्ट्र ठोस दिधला विश्वास चोहीकडे ।।२।।

आम्हीही अणु-अस्त्र धारण करू, होऊन विश्वा गुरू
आम्हीही अणुला विभक्त करुनी, ऊर्जा अणूची वरू ।
आम्ही शांती उगा न सोडू तरीही, धाका न सोसू जनी
हा संदेश चिदंबरं विखुरती, स्फोटा करूनी रणी ।। ३ ।।

अशा प्रकारे आधुनिक भारतास विश्वगुरू होण्यास उपकारक ठरणाऱ्या वरील घटना वैशाख पौर्णिमेच्या दिवशीच घडून आल्याने, आपल्याकरता या दिवसाचे मोल अनमोल आहे. त्यामुळे बुद्धपौर्णिमा साजरी करत असताना आपण सगळ्यांनीच, आपल्या सनातन सामर्थ्यांना उजागर करणाऱ्या या घटनांची स्मृती जागवून, भविष्यात त्यांना आणखीही सन्मान देणाऱ्या घटना घडवून आणण्यास प्रवृत्त व्हावे हीच सदिच्छा.

येती वैशाख पौर्णिमा सोमवार दिनांक १६ मे २०२२ रोजी आहे. त्या दिवसाकरता आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा!


**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*
*०२२-२५४२ ६२७०*

# निका टर्बिना : रशियन कवयित्री

*निका टर्बिना या प्रतिभावान रशियन कवयित्री बद्दल लिहिलेला डॉ. आनंद कुलकर्णी यांचा लेख – संपादक*



निका टर्बिना (Nika Turbina) ही सोविएत रशियन कवयित्री. जन्म १९७४ चा, मृत्यू २००२ चा. अवघं २८ वर्षांचं आयुष्यं. या एवढ्याशा आयुष्यात ती अनेक आयुष्यं जगली! सतत वेगवेगळ्या दु:खद प्रसंगांना तिला तोंड द्यावं लागलं. ११ वर्षांची असताना आईने दुसरं लग्न केलं. बापाविना वाढणारी पोर म्हणून प्रसिद्ध रशियन कवी Yevgeny Yevtushenko ने तिचं पालकत्व पत्करलं. पण ती मोठी होत गेली तसा त्यांच्यात दुरावा येत गेला. लहानपणापासून तिला दम्याचा त्रास होता आणि पुढे तिला निद्रानाशाचा विकार जडला. कवी म्हणून प्रसिद्धी मिळाल्यावर तिचा मानसिक ताण वाढत राहिला. १९९० साली स्वित्झर्लंडमधे तिच्यावर उपचार करणाऱ्या मानसोपचार तज्ज्ञाबरोबर तिने लग्न केलं. या वेळी तिचं वय होतं १६ वर्षे आणि मानसोपचार तज्ज्ञ असलेल्या प्राध्यापकाचं ७६ वर्षे! एक वर्षानंतर नवऱ्याला सोडून ती रशियात आपल्या घरी परतली. या दरम्यान नोकरीसाठी तिने प्रयत्न केले. वेळ वाया जातोय हे बघून तिने मास्को इन्स्टिट्यूट ऑफ कल्चर मधे शिकण्यासाठी प्रवेश घेतला. पण ढासळती मानसिकता आणि वाढत जाणारं मदिरा प्राशन यांमुळे या संस्थेने तिला काढून टाकलं. तिचं व्यसन वाढत गेलं आणि मानसिक संतुलन बिघडत गेलं. पाचव्या मजल्याच्या बाल्कनीतून तोल गेल्यामूळे ती खाली पडली. झाडावर पडल्यामुळे ती वाचली, पण जबर जखमी झाली. तिचं व्यसन वाढत राहिलं आणि २००२ मधे दुसऱ्यांदा पाचव्या मजल्याच्या खिडकीतून ती खाली पडली आणि त्यात तिचा दुर्दैवी मृत्यू झाला.

आता तुम्हाला वाटेल यात सांगण्यासारखं काय आहे? निका ही कवितेतील child prodigy होती. मोझार्ट, पिकासो, जॉन नॅश, श्रीनिवास रामानुजन यांच्यासारखी. वयाच्या चौथ्या वर्षी तिने पहिली कविता लिहिली. वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी तिचा पहिला The First Draft नावाचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. त्याला विख्यात रशियन कवी, Yevgeny Yevtushenk यांची प्रस्तावना लाभली. तिच्या संग्रहाला रशियाचा प्रतिष्ठित Venetian Golden Lion पुरस्कार मिळाला. तिला जगभर अमाप प्रसिद्धी मिळाली. पण नंतरच्या काळात ती दर्जेदार कविता लिहू शकली नाही. एका अर्थी कविता तिला सोडून गेली होती. हे काव्यशक्ती गमावणं, वेगानं बदलणारं जीवन आणि निराशा यामुळे ती डिप्रेशनमधे गेली. सतत अंगावर येणारा आणि सरत राहणारा काळ ही तिच्यासाठी चिंताजनक गोष्ट होती. वाळूसारखी सतत हातून निसटून जाणारी वेळ आणि कवितेने सोडलेली साथ यामुळे ती अधिकाधिक खचत गेली. इतक्या लहान वयात पदरात पडलेलं कवितेचं दान कसं सांभाळायचं आणि अफाट प्रसिद्धी कशी हाताळायची हा तिच्यापुढचा मोठा प्रश्न होता. सरणारं बालपणं आणि वेगाने येणारं प्रौढत्व यांतला ताण आणि

तोल ती सांभाळू शकली नाही. प्रौढत्वाची चाहूल लागल्यामुळे बालपणातील निरागसता हळूहळू संपतेय याची तिला सतत टोचणी होती. निरासगता सांभाळता येत नाही या अगतिकतेमधून तिने व्यवहारी जगातील परिस्थिती स्वीकारायचा प्रयत्न केला, पण तो केविलवाणाच ठरला. वाढत जाणाऱ्या वयाने तिच्या भावनांचा प्रचंड कोंडमारा केला. वाढतं वय, त्यानुसार जगाच्या तिच्याकडून असलेल्या अपेक्षा आणि बालसुलभ निरागसतेत अडकलेल्या तिच्या भावमयी कविता यांचा मेळ कधीच बसला नाही. 'प्रौढ जगाच्या क्रूर धारणांपासून मुक्त असलेली अभिव्यक्ती' म्हणून निकाची कविता समजून घ्यावी लागते. प्रौढत्वात गमावलेली संवेदनशीलता ही तिच्यासाठी मोठी हानी आहे. तिच्याच शब्दांत सांगायचं तर-

I said everything there was to say about myself in my poems, when I was just a child. I needn't have grown into this woman's body.

व्यवहारी जगामुळे आलेली समज, ज्ञानाची आणि सद्गुणांची झालेली प्राप्ती आणि नैतिकतेचा दंडक यांमुळे आपण सतत कशाच्यातरी मागे धावत राहतो. आपल्याला उसंत अशी नसतेच. या सगळ्या धामधुमीत आपल्यातलं मुल चिरडून जातं. वास्तवाचे सगळे चटके कोवळ्या आणि नव्हाळ बालपणाला करपून टाकतात. मग उरते ती स्पर्धा, हाव आणि जिंकण्याची ईर्षा. प्रौढत्वात आपल्यातील मूल जणू कैदेत असतं. हा असा निरागसता गमावल्याचा आणि प्रौढत्वाचा काटेरी ढोंगी शहाणपणा आल्याचा सल तिच्या मनात कायम राहिला. प्रेम या भावनेने माणसं खरे तर जवळ यायला हवीत. पण प्रेमातून आनंद मिळतोच असं नाही. मग माणसं तुटत राहतात, वेगळी होतात. खोटारड्या आणि स्वार्थी धारणांमुळे आपण खरा आनंद गमावून बसतो.

निकाची कविता असा ताण व्यक्त करते. पण त्यापेक्षा महत्त्वाचं म्हणजे वाढत्या वयासोबत येणाऱ्या समजेने तिच्या कवितेला निस्तेज केलं. 'ज्ञान निरागसतेला भ्रष्ट करते' ही गोष्ट तिच्या कवितेने अधोरेखित केली. ती मोठी झाल्यावर लहानपणासारखी उत्कट कविता लिहू शकली नाही हे अर्धसत्य आहे. प्रौढ, व्यवहारी जगाने तिच्या निरागसतेला व्यक्त होऊ दिले नाही हे अधिक खरं आहे.

निकाची ही कविता वाचा. दहाव्या वर्षी लिहिलेली. विश्वास बसत नाही पण आहे हे असं आहे-

Heavy are my versesa

Stones uphill.

I will carry them up to the crag,

The resting place.

I will fall face down in the weeds,

Tears will not do.

I will rend my strophea

The verse will burst out crying.

Pain cuts into my palma

Nettles!

The day's bitter taste turns

All to words.

**- डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव
ता. जुन्नर, जि. पुणे- ४१०५०४

●●●

जीवनात यश कायम नसते. तसेच अपयशही अंतिम नसते. जोवर तुमचा विजय इतिहास बनत नाही. तोवर प्रयत्न करणे थांबवू नये.

# किती जवळ, तरीही किती दूर.....

*डॉ. शंकर आचार्य लिखित ''An Economist at Home and Abroad'' या पुस्तकाविषयी लेखकाने 'किती जवळ, तरीही किती दूर'' असे वाटत राहण्याची कारणमीमांसा या लेखात दिली आहे - संपादक*

डॉ. शंकर आचार्य भारत सरकारचे सर्वात जास्त काळ प्रमुख आर्थिक सल्लागार (Chief Economic Advisor म्हणजेच CEO) राहिलेले अर्थकारणी.

भारत सरकारशी संबंधित अर्थकारणी ही काही त्यांची एकमेव ओळख नाही. सरकारी नोकरीत येण्याआधी जागतिक बँकेत (वर्ल्ड बँक) नोकरी आणि सरकारी नोकरी नंतर तब्बल १२ वर्षे कोटक महिंद्रा बँकेच्या संचालक मंडळाचे (बोर्ड ऑफ डायरेक्टर) सभासद... त्यांपैकी अनेक वर्ष अ-कार्यकारी अध्यक्ष (नॉन-एक्झिक्युटिव चेअरमन).

त्याचबरोबरीने अनेक वर्ष आपल्या देशाच्या महत्त्वाच्या आर्थिक नियतकालिकात सातत्यपूर्ण स्तंभलेखन...इतके सातत्यपूर्ण की, ज्या लेखांच्या संकलनातून एक-दोन नव्हे तर उणीपुरी ६ पुस्तके प्रसिद्ध झाली!

अशा व्यक्तीचे जेंव्हा नवीन पुस्तक पाहाण्यात येते, तेंव्हा ते पुस्तक तातडीने वाचण्याची इच्छा होते. कोरोनाच्या काळाने अनेकांना लिहिते केले. त्यातली कित्येक पुस्तके तुमच्या-माझ्यासारख्या सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोचतही नाहीत.

पण विषय आणि लेखक या दोन्ही निकषांवर हे पुस्तक असे आहे की, ते पुस्तक ताबडतोब वाचण्याचा मोह आवरत नाही.

पण म्हणातात ना....

की

''चकाकते ते सर्व सोने नसते !''

या उक्तीला सार्थ करणारे पुस्तक म्हणजे शंकर आचार्य यांचे ''An Economist at Home and Abroad'' हे पुस्तक.

हे पुस्तक वाचत असताना पदोपदी होत राहणारी एकमेव जाणीव म्हणजे ''किती जवळ, तरीही किती दूर !''

''किती जवळ, तरीही किती दूर'' असे या पुस्तकाविषयी वाटत राहण्याची अनेक कारणे आहेत. त्यांपैकी सगळ्यात महत्त्वाचे कारण म्हणजे मा. श्री. शंकर आचार्य हे स्वतंत्र भारताच्या आर्थिक इतिहासातील सगळ्यात जास्त काळ केंद्र सरकारचे आर्थिक सल्लागार राहिलेले अर्थकारणी आहेत. त्यातही आपल्या देशाच्या अर्थकारणाला वेगळी आणि निश्चित दिशा देणाऱ्या १९९० च्या दशकात ते अशा सल्लागारपदी रुजू होते. या दशकात संख्या आणि प्रभाव म्हणून अनेक महत्त्वपूर्ण आर्थिक धोरणात्मक निर्णय घेतले गेले. तरीही ''An Economist at Home and Abroad'' असे शीर्षक असणाऱ्या या पुस्तकात ना सगळ्या निर्णयांचे उल्लेख येत, ना कोणत्याही एकाही निर्णयाची पार्श्वभूमी, तार्कीकता, परिणामांची चिकित्सा येते.

याबाबत वाचकांच्या पदरी हे पुस्तक घोर निराशा टाकते. डॉ. आचार्य यांचा तत्कालीन कार्यभार आणि त्यांचे अर्थशास्त्र विषयक शिक्षण ऑक्सफर्ड आणि हॉर्वर्ड विद्यापीठात झाले आणि केंद्र सरकारचे आर्थिक सल्लागार होण्याआधी जागतिक बँकेत कार्यरत असताना

या जगात तुमच्या यशाच्या वाटेवर लोक नेहमीच दगडफेक करतील. पण त्या दगडांपासून भिंत बनवायची की पूल बांधायचा ते तुमच्यावरच अवलंबून आहे!

एकापेक्षा जास्त वर्ल्ड डेव्हलपमेंट रिपोर्ट तयार करण्याची कामगिरी त्यांनी यशस्वीपणे पार पाडली होती हे लक्षात घेता असा अपेक्षाभंग सर्वसामान्य वाचक म्हणून टोचत राहतो.

आणि म्हणून ''किती जवळ, तरीही किती दूर'' असे या पुस्तकाविषयी वाटत राहते.... वाचतानाही आणि वाचून पूर्ण झाल्यावरही !

या प्रकारचे पुस्तक आणि अशा प्रकारचे लेखक यांच्याकडून अशी अपेक्षा ठेवणे चूक नक्कीच नाही. विशेषतः ही मंडळी जर अशी पुस्तके सेवानिवृत्त झाल्यावर लिहीत असतील तर नाहीच नाही. डॉ. शंकर आचार्य यांचे शैक्षणिक आयुष्यातील वरिष्ठ सहाध्यायी, व्यावसायिक-सरकारी आयुष्यातील सहकारी, वैयक्तिक आयुष्यातील मित्र असणारे मॉन्टेकसिंग अहलुवालिया यांचे ''Backstage हे पुस्तक याबाबतीत किती सरस आणि उजवे आहे याची प्रचिती हे पुस्तक येत असताना वारंवार येत राहते.

मॉन्टेकसिंग अहलुवालिया यांच्या ''Backstage'' या पुस्तकाच्या बरोबरीने अरविंद सुब्रमण्यम यांच्या ''Of Counsel'' या पुस्तकाचीही आणि एन. के. सिंग यांच्या ''Portraits of Power'' या पुस्तकांचीही या संदर्भात इथे हमखास आठवण होते.

या तिघांच्याही नावांचा डॉ. शंकर आचार्य यांच्या या पुस्तकात उल्लेख आहे. हे तिघेही सरकारी आर्थिक क्षेत्रातील कारकीर्द या निकषांवर डॉ. आचार्य यांचे समकालीन आहेत. या तिघांनीही सेवानिवृत्त झाल्यावर अशा प्रकारची सखोल विवेचनात्मक पुस्तके लिहिली आहेत.

पण डॉ. शंकर आचार्य यांचे हे पुस्तक याबाबत खूप कमी पडते. डॉ. आचार्य यांच्या वृत्तपत्रीय स्तंभलेखनाचे वाचक असणाऱ्या मंडळींचे तरी हे पुस्तक वाचल्यावरची प्रतिक्रिया किती जवळ, तरीही किती दूर अशी होण्याची शक्यता बिलकूल नाकारता येत नाही.

कदाचित डॉ. शंकर आचार्य यांचे हे संबंधित पुस्तक त्यांचे हॉर्वर्ड विद्यापीठातले प्राध्यापक असणाऱ्या डॉ. सुब्रमण्यम स्वामी यांच्या ''Reset'' पुस्तकासारखे आहे. उत्तम विषयाच्या आकर्षक मांडणीच्या वेष्टनात आशयाचे मृगजल आणि म्हणून किती जवळ, तरीही किती दूर !

डॉ. आचार्य यांच्या ''An Economist at Home and Abroad'' या पुस्तकाविषयी किती जवळ, आणि तरीही किती दूर असे वाटण्याचे अजून एक कारण म्हणजे, या सुमारे ३०० पानी पुस्तकात देशाच्या किंवा जागतिक अर्थव्यवस्थेच्या प्रवासापेक्षा व्यक्ती म्हणून डॉ. शंकर आचार्य व त्यांच्या कुटुंबीयांनी केलेल्या पर्यटनात्मक प्रवासाचीच वर्णने येण्यातच या पुस्तकाची जास्त पाने खर्ची पडली आहेत. त्यामुळे या पुस्तकाच्या नावात Economist या शब्दा ऐवजी Tourist हा शब्द जास्त समर्पक आणि चपखल ठरला असता असे वाटते.... ''The Tourist at Home and Abroad !''

किती जवळ, आणि तरीही किती दूर !

डॉ. शंकर आचार्य यांचे हे पुस्तक वाचत असताना एक मात्र जाणवत राहते की, आर्थिक धोरण आणि त्याची अंमलबजावणी हे क्षेत्र आता करियर म्हणून अलीकडच्या काळात निश्चितच महत्त्वाचे ठरत आहे. त्यामुळे 'महाजनो येन गत: स: पंथ:' म्हणत डॉ. शंकर आचार्य यांच्या सारख्या गेल्या पिढीतील दिग्गज अर्थकारणी व्यक्तीने स्वतःला शैक्षणिक, व्यावसायिक दृष्टीने कसे घडवत नेले हे पाहाणे महत्त्वाचे ठरते. अर्थात त्यादृष्टीने डॉ. आचार्य यांचा विद्यार्थी-दशेचा आणि प्राथमिक व्यावसायिक आयुष्यातला काळ व सध्याचा किंवा येणारा काळ यात खूपच महदंतर आहे. काळाच्या पुलाखालून खूपच पाणी दरम्यानच्या काळात वाहून

---

जेव्हा मोठा पाऊस होतो, तेव्हा सगळे पक्षी निवाऱ्यासाठी जागा शोधायला लागतात. पण गरूड मात्र खूप उंच उडतात आणि ढगांच्याही वर जातात... त्यांची समस्या सारखीच असते; मात्र 'ॲटिट्यूड' वेगळा असतो!

गेले आहे. तरीही अशी वाटचाल करण्याचे साधन म्हणून या पुस्तकाकडे पाहावे तर तीही अपेक्षा पूर्ण होत नाही. बदललेला काळ इतकेच त्याचे कारण असत नाही. अशाही अर्थाने 'किती जवळ, तरीही किती दूर! '

एक मात्र होते की, आपल्या घरातील अनेक माणसे अनेक सरकारी पदांवर असण्याचे फायदे आणि अनुभव कसे उपयोगी पडते हे मात्र नकळतपणे वाचकांच्या मनावर बिंबले जाते. पण हा फायदा बहुतांश वाचकांना कसा काय असणार ?

अशाही अर्थाने किती जवळ, आणि तरीही किती दूर!

डॉ. शंकर आचार्य हे केंद्र सरकारचे आर्थिक सल्लागार असण्याच्या काळात आपल्या देशाने पी. व्ही. नरसिंह राव आणि अटलबिहारी वाजपेयी हे दोन पंतप्रधान आणि डॉ. मनमोहनसिंग, पी. चिदंबरम आणि यशवंत सिन्हा हे ३ अर्थमंत्री पाहिले. या दोन पंतप्रधानांच्या आणि तीन अर्थमंत्र्यांच्या कारकिर्दीचे मूल्यमापन अक्षरशः काही ओळीत या पुस्तकात शब्दशः आटोपण्यात आले आहे. हा काही या पुस्तकाचा मुख्य उद्देश नाही हे कितीही मान्य केले तरी या पुस्तकात आला आहे इतका त्रोटक उल्लेख एक वाचक म्हणून नक्कीच खटकतो. अशाही अर्थाने किती जवळ, आणि तरीही किती दूर!

त्यातही आजमितीस डॉ. मनमोहनसिंग, पी. चिदंबरम आणि यशवंत सिन्हा हे या ना त्या स्वरूपात, या ना त्या प्रमाणात भारतीय राजकारणात सक्रिय आहेत म्हणून त्यांच्याविषयी सविस्तर चर्चा पुस्तकात टाळली असावी असे मानण्यास वाव आहे. राजकीय शिष्टाचार, सामाजिक सभ्यता आणि व्यावसायिक सोय अशा सगळ्याच अर्थाने !

पण हा मुद्दा पी. व्ही. नरसिंह राव आणि अटलजी यांच्याबाबत खरा नाही. तरीही ते ज्या पक्षाच्या सरकारचे पंतप्रधान होते त्या त्या पक्षातही आज हे दोन्ही दिवंगत नेते आजमितीस प्रसंगोपात उल्लेखाचे आणि सोयीस्कर स्मरणाचे धनी उरले आहेत. तरीही या दोन माजी, कर्तृत्ववान आणि दिवंगत अशा पंतप्रधानांविषयीची चर्चा या पुस्तकात आटोपतीच घेण्यात आली आहे.

अशाही अर्थाने किती जवळ, आणि तरीही किती दूर!

अशा अगदी आटोपत्या चर्चेतही डॉ. शंकर आचार्य लिहून जातात की, अर्थकारण या मुद्यावर नरसिंह राव यांच्यापेक्षा अटलजी जास्त महत्त्वाचे पंतप्रधान ठरतात. समज आणि अंमलबजावणी या मुद्यांबरोबरच परिस्थितीचा रेटा नसून सुद्धा अटलजीनी जोमदारपणे आर्थिक सुधारणा पुढे नेल्या असे प्रतिपादन डॉ. शंकर आचार्य या पुस्तकात एका वाक्यात मांडतात.

या मुद्याचे आर्थिक महत्त्व डॉ. आचार्यांना दुसऱ्या कोणी सांगायला हवे असे नाही.

तसेच असा कोणताही निष्कर्ष मांडताना इतर आर्थिक सिद्धांता सारखे गृहीतके-तत्त्व-सोदाहरण विवेचन आणि या सगळ्यांच्या आधारे सरतेशेवटी निष्कर्ष अशी मांडणी या महत्त्वपूर्ण विधानांबाबत (खरं म्हणजे, संपूर्ण पुस्तकातच कुठेही आणि कोणत्याही मुद्यावर) या पुस्तकात येत नाही. अशाही अर्थाने किती जवळ, आणि तरीही किती दूर !

हाच प्रकार १९९०च्या दशकातील डॉ. मनमोहनसिंग, पी. चिदंबरम आणि यशवंत सिन्हा या आपल्या देशाच्या तीन अर्थमंत्र्यांबाबतही या पुस्तकात आहे. या तिघांची क्रमवारी लावायची झाल्यास डॉ. मनमोहनसिंग सर्वात सरस अर्थमंत्री आणि त्यांच्यापेक्षा जेमतेम काकणभरच कमी (Close Second असा नेमका शब्दप्रयोग) असे यशवंत सिन्हा असा ओझरता उल्लेख करून डॉ. आचार्य हा वैशिष्ट्यपूर्ण मुद्दा संपवतात. अशाही अर्थाने किती जवळ, आणि तरीही किती दूर !

(या दोन पंतप्रधान आणि तीन अर्थमंत्र्यांबाबत

---

बालक दिवसात साधरण चारशे वेळा हसते आणि प्रौढ व्यक्ती दिवसाला साधारण पंधरा वेळा हसतात. आपले हास्याचे हे ३८५ क्षण कुठे हरवतात?

डॉ. शंकर आचार्य यांनी मांडलेले निष्कर्ष वाचताना मनोमन फार बरे वाटले. कारण गेली काही वर्षे Indian Institute of Democratic Leadership , मुंबई आणि MIT school of Governance, पुणे, MIT School of Economics, पुणे या संस्थांत सेशन्स घेताना हेच मत मी सविस्तर व सोदाहरण मांडत असतो. २०१५ साली गुढीपाडव्याच्या दिवशी डॉ. मनमोहनसिंग यांच्याशी झालेल्या प्रदीर्घ वैयक्तिक भेटीतही त्यांना हे मत सांगण्याचे धारिष्ट्य मी दाखवले होते.)

हे पुस्तक वाचत असताना सतत वाटत राहते की, भले विवेचन एकांगी झाले असते तरी चालले असते. पण इतके त्रोटक आणि तटस्थ विवेचन पुस्तकाचा मूळ हेतूच गारद करते. भले एखाद्या वाचकाला काही मुद्दे पटतील, काही पटणार नाहीत. पण निदान काही तपशील, काही विवेचन तर वाचकांच्या पदरी पडले असते. तसेही अलीकडच्या काळात एकांगी, एकसूरी, कंठाळी विवेचन वाचण्याची तुमच्या-माझ्यासारख्या वाचकांना पुरेपूर सवय झाली आहेच की ! आपण सगळेच आता नियतकालिक आणि लेखकाचे नाव पाहूनच त्यात काय लिहिले असेल याचा अंदाज बांधण्यात तज्ज्ञ झालो आहोतच की! कदाचित असा अतिरेक टाळण्याच्या नादात कुठेच न पोचलेले हे पुस्तक.

अशाही अर्थाने 'किती जवळ, आणि तरीही किती दूर!'

**- चन्द्रशेखर टिळक**
सी -४०२. राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व )
पिन - ४२१२०१
भ्रमणध्वनी - ९८२०२९२३७६

•••

(पृष्ठ क्र.६ वरून - **तलाव ते टॉवर)**

टाकण्यासाठी खोदकाम करताना अनेक भग्न मूर्ती मिळाल्या. जेलच्या भिंतीवर आजही देवालयाचे नक्षीकाम केलेल्या शिळा आहेत. स्वा. सावरकर यांनाही याच कारागृहात ठेवले होते. ठाणे शहरातील रस्ते पूर्वी कसे होते, त्या वेळेला बैलगाडीने पाणी रस्त्यांवर मारत असत. मोठी टाकीवाला ट्रक ६४-६५ नंतर ठाण्यामध्ये आला. पूर्वी नौपाडा ही ग्रामपंचायत होती. तेथे हाटे यांची शेत-जमीन होती, असे ऐकण्यात आलेले आहे.

आमच्या लहानपणी रस्त्याच्या दोन्ही बाजूला काचेचे मोठे कंदील नगर परिषदेमार्फत लावले होते. त्याची उंची साधारण नऊ दहा फुटांवर असे. त्यामध्ये दिवाबत्ती करण्यासाठी सायंकाळी नगरपरिषदेचा माणूस सायकलला शिडी अडकवून आणि रॉकेल, मेणबत्ती वगैरे घेऊन येत असे. तसेच मनोरुग्णालयाचा देखील उल्लेख करण्यात आला नाही.

वरील सर्व प्रतिक्रिया या कार्यक्रमाहून आल्यावर रात्री लिहून पूर्ण झाल्या व त्यानंतर पुस्तक वाचले. त्यामध्ये मी वर लिहिलेल्यापैकी ३-४ गोष्टींचा उल्लेख काही लेखकांनी केला आहे.

**- अुत्तम भास्कर जोशी**
'उषाभास्कर', जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग,
पांचपाखाडी, 'कचराळी' तलावासमोर,
ठाणे-४००६०२.
मो.नं.: ९८२११६४६१७
Email : ubj1234knsba@gmail.com


•••

# कै. कृष्णास्वामी भट - जीवन प्रकाश

*हंपी येथील बडविलिंग मंदिराचे पुजारी 'कै. कृष्णास्वामी भट' यांचा दिनांक २६ एप्रिल हा प्रथम स्मृतिदिन! त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारा लेख- संपादक*

हंपी ! वैभवसंपन्न अशा हिंदूंच्या 'विजयनगर' साम्राज्याची राजधानी म्हणजे तुंगभद्रेच्या किनाऱ्यावरील सांस्कृतिक तीर्थक्षेत्रच जणू....

विजयनगर साम्राज्याचे सर्व राजे हिंदू धर्म व संस्कृतीचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य मानीत. त्यामुळेच हंपीतील वास्तुकला, शिल्पकला, चित्रकला, संगीत इत्यादींमध्ये आपल्याला हिंदू संस्कृतीचे वैविध्यपूर्ण दर्शन घडते. 'विरुपाक्ष मंदिर, विजयविठ्ठल मंदिर, नृसिंह व गणेश मंदिर, हजार राम मंदिर, बडविलिंग मंदिर' ही हंपीतील प्रमुख मंदिरे होत. सांस्कृतिकदृष्ट्या या मंदिरांचे संरक्षण व संवर्धन व्हावे याकरिता हंपी हे युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत येते.



तिथल्या मंदिरांची उंच गोपुरे, हजार राम मंदिराच्या भिंतीवर कोरलेले रामायणातील प्रसंग, विठ्ठल मंदिराचा शिलारथ, अखंड दगडात कोरलेल्या विशाल नृसिंह मूर्ती आणि गणेश मूर्ती इत्यादीचे फोटो आपल्याला फेसबुक, व्हाट्सॲप, ट्विटर यांसारख्या समाजमाध्यमातून अनेकदा पाहायला मिळतात. दिनांक २५ एप्रिल रोजी देखील हंपीच्या संदर्भात समाज माध्यमांवर एक बातमी येऊ लागली. तेथील सुप्रसिद्ध 'बडविलिंग शिवमंदिराचे पुजारी - कृष्णा भट' यांचे निधन झाल्याचे वृत्त आपल्या सर्वांना समजले. कर्नाटक राज्याचे समाजकल्याण मंत्री श्री. बी. श्रीरामुलु यांनी याबाबत अधिकृत ट्विट करून माहिती दिली आणि हंपीला भेट देणाऱ्या, तसेच कृष्णा भट यांच्याबद्दल आदर असणाऱ्या जगभरातील पर्यटकांचे डोळे पाणावले.

गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ कृष्णास्वामींनी बडविलिंग शिवमंदिराचे पुजारी म्हणून पूजन केले. हंपीला भेट देणारे जगभरातील पर्यटक कृष्णास्वामींना भेटण्यासाठी उत्सुक असायचे. साधारणपणे ३ मीटर उंच असणाऱ्या विशाल शिवलिंगाची ते ज्या विशिष्ट प्रकारे पूजा करत, त्यामुळे पर्यटकांमध्ये ते चर्चेचा विषय बनले होते. शिवपिंडीची पूजा करताना त्यांचे छायाचित्र घेण्यासाठी अनेकजण उत्सुक असायचे. यामुळे अनेक माध्यमांतून त्यांचे छायाचित्र जगभर प्रसिद्ध होत असे.

---

इतिहास शिकणे सोपे असते; पण तो तयार करणे अवघड असते. तुमचा स्वतःचा 'इतिहास' तयार करा आणि इतरांनी त्याचा कित्ता गिरवावा, असे काम करून दाखवा.

पण एवढीच मर्यादित त्यांची ओळख होती का ? एक पुजारी म्हणून त्यांच्यात असे काय वेगळेपण होते, ज्यामुळे त्यांच्या मृत्यूची दखल अनेक पर्यटकांनी, मंत्र्यांनी व जगभरातील प्रसारमाध्यमांनी घेतली? त्यांचे हे वेगळेपण आणि त्यामागील त्यांचे मोठेपण जाणून घ्यायचे, तर यासाठी आपल्याला काही बाबी जाणून घ्याव्या लागतील.

ते ज्या बडविलिंग शिवपिंडीचे पूजन करत, तिच्याभोवती कायम पाणी असते. साधारणपणे ९ फूट उंच शिवपिंडीवर कोणत्याही व्यक्तीचे हात पोहोचणे हे केवळ अशक्य आहे. त्यामुळे कृष्णास्वामी त्या पिंडीच्या खालच्या भागावर पाय ठेवून, थोडक्यात शिवपिंडीवर चढून नित्यपूजा करत असायचे. खरंतर याठिकाणी आपल्या मनात शंका निर्माण होते की, असे कसे कोणी शिवपिंडीवर पाय ठेवू शकतो ? पण तिथे कोणता दुसरा पर्यायही नव्हता. शिवपिंड कायम पाण्याने वेढलेली असल्याने, शिडीचा वापर करता येत नसे. शिवाय ते मंदिर युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांत येत असल्याने, तिथे कोणत्याही स्वरूपात नवीन बदल करता येत नाहीत. त्यामुळे कृष्णास्वामींना शिवपिंडीवर चढून पूजा करण्याशिवाय पर्यायच नव्हता. त्यांची श्रद्धा आणि भक्ती पाहून कोणीही याबाबत त्यांना दोष देत नसे. उलटपक्षी त्यांच्याप्रति त्या व्यक्तीच्या मनात आदरच निर्माण होत असे. खरेतर अशी उदाहरणे फार कमी असतात. आपल्याला 'विसोबा खेचर' हे माहीतच आहेत. नामदेव महाराजांची आणि त्यांची भेट झाली, त्यावेळी ते औंढ्या नागनाथ ज्योतिर्लिंगाच्या पिंडीवर पाय ठेवून बसल्याचे आपल्याला वाचावयास मिळते.

त्यांचा मुलगा राघवेंद्र याने सांगितल्याप्रमाणे, कृष्णास्वामींचे पूर्ण नाव 'के. एन. कृष्णा भट' असे होते. त्यांच्या नावातील के. हे अद्याक्षर त्यांचे मूळ गाव 'कासारवल्ली' याबद्दल असून; एन्. हे अद्याक्षर 'नरसिंहा' या त्यांच्या वडिलांच्या नावाबद्दल आहे. दक्षिण भारतात अशा पद्धतीने नाव सांगण्याची परंपरा असल्याचे आपण पाहतोच.

**पवित्र तें कुळ पावन तो देश ।**
**जेथें हरीचे दास जन्म घेती ।।**

तुकाराम महाराजांनी लक्षणे सांगितल्याप्रमाणे कृष्णा भट यांचा जन्म एका पवित्र कुळात झाला होता. त्यांच्या घराण्याचे मूळ पुरुष 'मयूर वर्मा' हे होत. इ.स. चौथ्या शतकापासून त्यांच्या घराण्याबाबत आपणाला माहिती मिळते. आंध्र प्रदेशातील पूर्व गोदावरी जिल्ह्यात या घराण्याचे वास्तव्य होते. हे घराणे 'शैवपूजक' असल्याने, मध्ययुगीन काळातील शैव-वैष्णव वादामुळे १३ व्या शतकात कर्नाटकातील उडूपी, मंगलोर आणि कारवार या भागात त्यांच्या घराण्याचे स्थलांतर झाले. कृष्णास्वामींचे पणजोबा शिमोगा जिल्ह्याच्या तीर्थहळ्ळी तालुक्यातील कासारवल्ली या गावात स्थायिक झाले. हे गाव श्रृंगेरीच्या 'शारदा पीठ'पासून साधारण ३५ कि.मी. अंतरावर आहे. कृष्णा भट यांचा जन्म १९३५ च्या फेब्रुवारी महिन्यातील, म्हणजे माघ महिन्याच्या शिवरात्रीच्या अगोदर झाला. कासारवल्ली गावातच त्यांनी चौथीपर्यंतचे शिक्षण घेतले. त्यावेळी देशभर स्वातंत्र्य चळवळ चालू होती. कृष्णास्वामी देखील स्वातंत्र्य चळवळीच्या आंदोलनात सक्रिय सहभागी होते. परंतु यामुळे त्यांना पुढील शिक्षण घेता आले नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते श्रृंगेरी पिठाच्या वेदपाठशाळेत दाखल झाले. आपले वैदिक शिक्षण पूर्ण करून पुन्हा कासारवल्ली गावात आले. त्यानंतर काही काळ बेंगलोर येथेही राहिले आणि पुन्हा गावी परतले. यादरम्यान १९६३ साली त्यांचे 'सीतालक्ष्मी' यांच्याशी लग्न झाले. पुढे त्यांना चार अपत्ये झाली. मोठ्या मुलाचे नाव - मंजुनाथ, त्यानंतर मुलगी - शारदा, आणि त्यानंतर राघवेंद्र व नागेंद्र ही दोन मुले, असा त्यांचा परिवार. परंतु

कासारवल्ली येथे त्यांची आर्थिक स्थिती नाजूक होती.

**पुण्य फळलें बहुतां दिवसां । भाग्य उदयाचा ठसा ।।**

याप्रमाणे त्यांचे भाग्य बदलले आणि रामचंद्र भट या पुजाऱ्याने १९७९ मध्ये त्यांना हंपीत बोलावून घेतले. तेथे सत्यनारायण मंदिराचे पुजारी म्हणून त्यांची नियुक्ती झाली. मोहरीच्या आकाराचा गणपती म्हणून प्रसिद्ध असलेल्या 'सासिवेकालु' गणेश मंदिराजवळ ते राहू लागले. हळूहळू त्यांनी गोपालन देखील सुरू केले. त्यावेळी त्यांच्याकडे ३० गाई होत्या.

दिनांक २४ ऑक्टोबर १९७८ रोजी तमिळनाडूच्या कांचीपुरम् येथील 'चंद्रशेखरेंद्र स्वामी' हे हंपीला आले होते. जवळपास सहा महिने त्यांनी हंपीत निवास केला. या काळात त्यांनी हंपीतील अनेक मंदिरांना भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी त्यांनी विजयनगरचे तत्कालीन राजघराण्याचे वंशज 'अच्युतदेव राय' यांना निदर्शनास आणून दिले की, बडविलिंग शिवपिंडीचे इस्लामी आक्रमकांच्या काळात कोणत्याही प्रकारे भंजन झालेले नाही. त्यामुळे मंदिराचे पावित्र्य अबाधित आहे आणि तिथे नित्य पूजाअर्चा होणे आवश्यक आहे.

'बडविलिंग आणि सत्यनारायण' ही दोन्ही मंदिरे जवळजवळ असल्याने, अच्युतदेव राय यांनी सत्यनारायण मंदिरासोबतच बडविलिंग मंदिराचीही पूजा करण्याची गळ कृष्णा स्वामींना घातली. यासाठी त्यांना प्रतिमाह तीनशे रुपये आणि नैवेद्याकरिता तांदूळ देण्याचे ठरले. या ठिकाणी आपल्याला कृष्णा स्वामींच्या मनातील श्रद्धा आणि समर्पण दिसून येईल. ते असे की, १९८६ साली ठरलेले वेतन त्यांनी आयुष्यभर, अगदी शेवटपर्यंत घेतले. त्याकडे त्यांनी कधीही व्यावहारिक दृष्टीने पाहिले नाही; की केवळ धनासाठी पूजाअर्चा केली नाही. विजयनगर राजघराण्याचे विद्यमान वंशज 'श्री. कृष्णदेवराय' सांगतात की, माझ्या वडिलांनी व मी अनेकदा त्यांच्याशी वेतनवाढी बाबत चर्चा केली. परंतु प्रत्येक वेळी त्यांनी याकरिता नम्रपणे नकार दिला.

हंपीत असलेले टूरिस्ट गाईड – श्री. बसवराज व सौ. पद्मावती बेल्लारी सांगतात की, गावातून स्वामीजी नेहमी पायी चालत. त्यांचे कधी कुणाशी अधिक बोलणे नसायचे. आलेल्या पर्यटकांशीदेखील मोजकेच बोलत असायचे. भल्या पहाटे येऊन पूजा करणे, आलेल्या फोटोग्राफरकरिता वेळ देणे, पर्यटकांशी बोलणे आणि घरी जाणे, हा त्यांचा नित्यक्रम होता. गेले ३५ वर्षांहून अधिक काळ त्यांनी अखंडितपणे बडविलिंग मंदिराची पूजा केली. त्यांचा मुलगा राघवेंद्र सांगतो की, ते घरातदेखील अधिक कुणाशी बोलत नसायचे. नेहमी कन्नड आणि संस्कृत भाषेतच बोलत असायचे. तेलगू देखील त्यांना जुजबी येत असायची, परंतु तिचा वापर देखील केवळ मंत्र वाचण्यासाठी करायचे. गांधीजींप्रमाणे आयुष्यभर त्यांनी 'धोतर व पंचा' हाच वेष ठेवला. आपल्या पत्नीसमवेत काशी विश्वनाथाच्या दर्शनाला जातानादेखील त्यांनी शर्ट घातला नव्हता.

**भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास ।**
**गेले आशापाश निवारूनि ।।**

**विषय तो त्यांचा जाला नारायण ।**
**नावडे जन धन माता पिता ।।**

तुकोबांच्या या वचनाप्रमाणे कृष्णास्वामी जगले. संसारात असूनही नसल्याप्रमाणे त्यांचा व्यवहार होता. उभ्या आयुष्यात कधीही एखादा चित्रपट वा नाटक देखील पाहायला ते गेले नाहीत. सध्या कोविड-१९ च्या साथीमुळे डिसेंबर २०२० पासून घरच्यांच्या आग्रहामुळे त्यांचे मंदिरात पूजा-अर्चा करणे बंद झाले होते. आता मुलगा राघवेंद्र हा मंदिरातील नित्य पूजा करतो.

**स्वर्ग जयाची साळोंखा। समुद्रपाळी पिंड देखा।**
**शेषासारखी बैसका। जो आधार तिही लोकां।।**

असे वर्णन ज्ञानेश्वर माउलींनी शिवपिंडीचे केले आहे. कृष्णास्वामींनी देखील बडविलिंग मंदिरातील शिवपिंडीत हेच पाहिले असणार, म्हणूनच आयुष्यभर श्रद्धापूर्वक, हृदयातील भक्तिभाव जपत आणि निष्ठापूर्वक त्यांनी नित्य पूजा-अर्चा केली. त्यात कधीही खंड पडू दिला नाही. त्यांच्या चेहऱ्यावरील तेज, त्यांची उजळलेली अंगकांती हे सारे एखाद्या योगी पुरुषाप्रमाणे वाटतं. हे जग सोडून जाण्यापूर्वी त्यांच्या मनात जन्मा आलो त्याचे । आजी फळ जाले साचे ।। असाच कृतकृत्यतेचा भाव असणार.

राघवेंद्र सांगतो, त्यांना कोणताही आजार नव्हता, की उच्च रक्तदाब वा मधुमेह नव्हता. पुरेसा आहार घेऊन ते ठणठणीत बरे होतील, असे डॉक्टरांनी सांगितले होते. त्यानुसार काही काळ त्यांनी इडली-डोसा असा आहार देखील घेतला. मात्र काही दिवसांतच त्यांनी स्वतःहून जेवण सोडले. केवळ पाणी व द्रवपदार्थ घेण्याचे ठरविले. असे चालू असतानाच यावेळी आपले जीवन सुफळ-संपूर्ण झाल्याची जाणीव त्यांना झाली असावी, म्हणूनच त्यांनी संपूर्ण खाणेपिणे बंद केले. एखाद्या जैन मुनिप्रमाणे 'संथारा व्रत' स्वीकारून त्यांनी आपला देह ठेवला. २५ एप्रिलच्या पहाटे ५:३० मिनिटांनी त्यांनी आपली इहलोकीची यात्रा पूर्ण केली. तत्पूर्वी दिनांक २४ च्या सायंकाळी एक गाय त्यांच्या अंगणात येऊन मोठमोठ्याने हंबरडा फोडत होती. खरे तर कृष्णास्वामींना ईश्वराने हा संकेतच दिला होता आणि हा शुभ-संकेत होता. आयुष्यभर तन-मन समर्पित करून त्यांनी ज्याची आराधना केली, त्या कैलासपतीने त्यांना आता कैलासात स्थान दिले होते.

**कृतकृत्य जालो । इच्छा केली ते पावलो ।।**

पंचतत्त्वात विलीन होताना हीच भावना त्यांच्या हृदयात दाटली असेल, यात शंकाच नाही.

आजही ईश्वराच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे काहीजण आहेत. पूजा-अर्चा याला थोतांड म्हणून सिद्ध करू पाहणाऱ्यांच्या युगात, कृष्णास्वामींसारखा भक्त आपल्यासमोर आदर्श आहे. 'श्रद्धा, भक्ती आणि समर्पण' या तीन नैतिक मूल्यांनी सामावलेले त्यांचे जीवन हे महादेवाच्या पिंडीवर वाहिलेल्या बिल्वपत्राचेच प्रतीक आहे.

**– ओंकार विजयकुमार शेटे**

●●●

---

(पृष्ठ क्र.४ वरून - **राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजनेतून व्यक्तिमत्त्व विकास**)

व ब्रीद वाक्य ''नही मै परतु तुम'' युवामध्ये सतत नव चैतन्य उत्पन्न करीत असते व स्फूर्ती देत असते. गेल्या काही वर्षापासून एन.सी.सी. छात्रांबरोबर एन.एस.एस.चे स्वयं-सेवकांना सुद्धा राजपथवर प्रजासत्ताक दिनी संचलन करण्यास संधी देण्यात आली आहे ज्याद्वारे एन.एस.एस. स्वयं-सेवकांसाठी प्रगतीचे एक नवे दालन उघडण्यात आलेले आहे. या सर्व व्यतिरिक्त मागील काही वर्षांपासून एन.सी.सी. व एन.एस.एस. हे अभ्यासक्रम रूपाने परीक्षेकरिता विषयाच्या स्वरूपातसुद्धा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध आहेत. विद्यार्थी उत्स्फूर्तपणे यांचा विषय म्हणून अभ्यास करीत आहेत.

एन.सी.सी. व एन.एस.एस. या दोन्ही योजनांमधून विद्यार्थी विद्यार्थिनींकरिता अनेक संधी आपल्या राष्ट्राने उपलब्ध करून दिल्या आहेत ज्यांचा लाभ युवा घेत आहेत व आपला राष्ट्रसेवेत योगदान देऊन प्रगती पथावरील वाटचालीची गती कायम ठेवत आहेत.

**– डॉ. मोझेस जे. कोलेट**
प्राचार्य
बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे

●●●

---

# व्रत
## (भाग – १)

*या लेखात वन्यजीवनाविषयी सखोल माहिती देण्यात आली आहे – संपादक*

उशापायथ्याशी जंगल आणि जीविधता (biodiverriry) असणारे लोक कसे राहतात? त्यांचं निसर्गाशी नेमकं कोणतं नातं असतं? ते ऋतुचक्राशी कसं जुळवून घेतात? पशुपक्ष्यांबरोबर कसे राहतात? हे प्रश्न बारोमास अळिंबीसारखे माझ्या डोक्यात उगवलेले असतात. आम्ही महाराष्ट्राच्या ईशान्य कोपऱ्यात राहतो. आमच्या पिटेझरी (तालुका साकोली, जिल्हा भंडारा) या गावात नाग किंवा चोका (Indian Cobra), धामण (Rat Snake), वाश्या (Buff-Striped Keelbabk), डोंगरयेल्या (Bronzebabk or Daudin's Bronzebabk), मुकी मांडवल किंवा दुतोंड्या (Common Sand Boa), घोणस (Russel's Viper), मण्यार (Common Krait), अजगर (Indian Rock Python), मांजऱ्या (Common Cat Snake), कवड्या (Common Wolf Snake), धोंड्या किंवा विरूळा (Checkered Keelbabk) हे साप कमी-अधिक प्रमाणात जवळजवळ वर्षभर दिसतात. प्रत्येक सापाला इथे आपापलं भक्ष्य सापडतं. नागाला कीटाहारी वाघळं आणि उंदीर, मण्यारीला एखादा विरूळा किंवा धोंड्या साप, दुतोंड्या किंवा मुकी मांडवल या सापाला उंदीर, कवड्याला पाली, डोंगरयेल्याला लहान पक्षी आणि बेडूक, वाश्याला जमीन उकरून खाली राहणारे आणि इतर जातींचे बेडूक, धामणीला उंदीर, अजगराला कोंबड्या आणि घुशी, धोंड्याला बेडूक आणि मासे...

गावात साप निघाला की, आजूबाजूचे चार-सहा लोक लाठ्या-काठ्या घेऊन तयारीनं येतात. विशेषतः



घरात निघालेला साप कुणी सोडत नाही आणि ते साहजिकच आहे. सापांबद्दल वाटणारी भीती हे त्याचं मूळ कारण आहे. विषारी साप चावून मृत्युमुखी पडलेल्या गावकऱ्यांच्या आठवणी लोक विसरू शकत नाहीत. गावातल्या, शेताला लागून असलेल्या एका घरात परसदारातून चालत चालत एक दुर्लाव किंवा डुरडुरा लावरी (Barred Buttonquail) आली होती. तिच्या मागे कुठला तरी शिकारी पक्षी लागला असावा. तेव्हा मला बोलावलं गेलं. घरातले लोक छान मजेत होते.



कुणीही घाबरलं नव्हतं. कुणालाही शिकारीची ऊर्मी आली नाही. मला न कळवता घरात आलेला पक्षी पकडून त्याची भाजी करून खाणं कुटुंबप्रमुखाला सहज शक्य होतं. पण तसं झालं नाही. परसदार उघडलं तशी तुरुतुरु धावत लावरी बाहेर गेली. बाकी काहीही करावं लागलं नाही.

सापाच्या बाबतीत आमच्या गावात हळूहळू पण निश्चित बदल होतोय. हा बदल खूप उत्साहवर्धक आहे. कुठेही साप दिसला की, लोक मला फोन करतात किंवा निरोप धाडतात. बहुतेक वेळेला गावातली लहान मुलं निरोप्याचं काम करतात. मी गावात नसलो आणि खूप धोका आहे असं लक्षात आलं तर मागे-पुढे न बघता, सरळ साप मारतात. मी असलो तर, बघ्यांच्या



गर्दीतून दोन-तीन जण तरी आपणहून पुढे येतात आणि साप वाचवण्याच्या प्रयत्नात मदत करतात. अजगर, सतरंज्या साप किंवा पट्टेरी मण्यारीसारखा (Banded Krait) साप पकडणं मला जमत नाही. मग मी सर्पमित्रांना बोलवतो. गावात साप निघाला की, लोक जमा होतात. अशा वेळी मला लोकांकडून खूप शिकायला मिळतं. प्रत्येक सापाबद्दल लोकांची स्वतःची अशी निरीक्षणं असतात. समजुती, गैरसमजुती असतात. जंगलापहाडात रहात असल्यामुळे एरवीसुद्धा खूप मोठ्यांदा बोलणारी झाडीपट्टीतली ही मंडळी साप म्हटलं, की अगदी बेंबीच्या देठापासून बोंबलतात. अशा वेळी मी कान टवकारतो. कारण मला नवीन शब्द शिकायला मिळतात. 'भस्बोड्या' हा असाच एक शब्द. वानरीच्या छातीला चिकटलेल्या पोरासारखी रानावनाशी एकंकार झालेली झाडी बोली* रानवट तर आहेच, पण सातपुडी माशीच्या मधासारखी गोडही आहे. म्हणून कोणत्याही वेळेला, कुठल्याही ठिकाणी झाडीपट्टीतले लोक जमले की, मी मुद्दाम वेळ काढून तिथे जातो आणि अक्षरशः अधाशासारखा ऐकतो.

(महाराष्ट्राच्या अतिपूर्वेचा कोपरा झाडीपट्टी या नावानं ओळखला जातो. भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या तीन जिल्ह्यांचा समावेश झाडीपट्टीत केला जातो. वैनगंगा नदीच्या पूर्व किनाऱ्यावरील मराठी भाषिकांच्या अखेरच्या भूप्रेशात बोलल्या जाणाऱ्या मराठीच्या बोलीला 'झाडीबोली' असं म्हणतात. (संदर्भ : झाडीबोली - मराठी शब्दकोश, लेखक - डॉ. हरिश्चंद्र प्रभाकर बोरकर)

साप वाचवण्याच्या आणि त्यांची सुटका करण्याच्या प्रयत्नात माझ्या लक्षात आलेली गोष्ट म्हणजे, प्रत्येक सापाची जणू काही दोन घरं असतात. दोन अधिवास असतात. एक रानातला आणि दुसरा गावातला. घराच्या दारात पकडलेला एखादा डोंगरयेल्या हा साप जर खूप लांब जंगलात नेऊन सोडला, तरी तो सहज जगू शकतो. त्याला झाडांवर राहणाऱ्या पाली, बेडूक, लहान पक्षी, पक्ष्यांची पिल्लं असं भक्ष्य मिळू शकतं. तो गावात येतो कारण तेच भक्ष्य गावातही उपलब्ध असतं. जिवंत राहणं आणि आपला वंश जागता ठेवणं हा त्यांचा मूलभूत सहजभाव (basic instinct) असतो. माणसानं वसवलेलं गाव आधी सापांचंच गाव होतं. माणसानं आखलेल्या लक्ष्मणरेषा रानावनातल्या जिवांना कळत नाहीत. आमच्या गावात एखादा अजगर येतो आणि गावकोंबड्या पकडतो. तोच अजगर पकडून जंगलात सोडला, तर रानकोंबड्या, मोर, ससे, चितळाची

पिल्लं, भेकराची पिल्लं, वानर यांच्या मागावर राहतो. याचा अर्थ, गावात पकडलेला आणि दूरस्थ जंगलात सोडलेला अजगर स्थानभ्रष्ट (displace) झाला असं होत नाही. दोन्ही ठिकाणी त्याचं पोट भरू शकतं.

सापांचं आणि इतर अनेक जिवांचं गाव उद्ध्वस्त करून माणसानं आपलं गाव वसवलं. कितीएक जीव निर्वासित झाले. केवळ खाद्य मिळतं म्हणून साप विटकी वाकर अंगावर ओढून घेतात! गावात येतात, घरादारात येतात. दुधारी तलवारीच्या झळाळत्या पात्यावरून सरपटण्याची जोखीम पत्करतात. शेपटीवरच पाय पडला तर नाग शांत कसा बसेल? एकदा जरी साप चावला, तरी माणूस कसं सहन करेल? इथेच संघर्ष गाभण राहतो आणि माणूस विरूद्ध साप हे कटू नातं जन्माला येतं. आमचा प्रयत्न माणूस आणि साप हे नातं जोपासायचं असा आहे. घरादारात आलेल्या, अडचणीत सापडलेल्या, जखमी झालेल्या सापांची सुटका करायची, त्यांना गावापासून दूर नेऊन सोडायचं हे सरिसृपव्रत आणि द्विजव्रत आम्ही धरलं आहे. आम्ही गेल्या तीन वर्षांत सुमारे शंभर सापांची यशस्वीरित्या सुटका केली आहे. जखमी झालेले किंवा अडचणीत सापडलेले पक्षी मात्र हाताच्या बोटावर मोजण्याएवढेच होते. ज्या ज्या दिवशी आम्ही या व्रतांची साधना केली त्या त्या दिवसांची मी काटेकोर नोंद केली. या नोंदवहीतील ही काही पानं...

**मोबाईलमुळे वाचला अजगर**

गुरुवार दिनांक ७ ऑक्टोबर २०२१ रोजी दुपारी ४ वाजता मला लतीश हरिश्चंद्र टेकाम या मित्राचा फोन आला. लतीश त्याच्या नेहमीच्या शांत, संथ आवाजात म्हणाला –

'दादा, शेतात चिट्टी आहे. लवकर या. मी थांबलो आहे. तुमची वाट बघत आहे. '

साप म्हटल्यावर मी वेळ न घालवता तसाच लेंग्यावर फडक् फडक् करत शेताच्या बांधांवरून चालत निघालो. सोबत सर्पकाठी आणि मोबाईल घेतला. सनान् चाललो तरी किशोर श्यामराव टेकाम याच्या शेतापर्यंत पोहोचायला तब्बल १५ मिनिटं लागली. नुकतीच धानकटाई झालेल्या एका शेताच्या कोपऱ्यात लतीश उभा होता. त्याच्या चेहेऱ्यावर किंचित ताण दिसत होता. त्याच्या जवळ पोहोचायच्या आधीच मी लतीशला घाईघाईत विचारलं –

'लतीश, साप कुठाय रे?'



लतीशनं शेताच्या धुऱ्यावर (बांधावर) असलेलं एक बीळ दाखवलं आणि मला म्हणाला –

'त्या दरात धसला आहे दादा चिट्टी सरप, त्या!'

मी खाली वाकून दरात म्हणजे बिळात डोकावून पाहिलं. मला पुसटसं का होईना पण एका अजगराचं तोंड दिसलं. माझ्या लक्षात आलं, की काहीही झालं तरी बीळ पोखरून अजगर बाहेर काढला पाहिजे. त्याला तसंच सोडून दिलं असतं तर माथ्यावर 'कोंबडगिळ्या' असा शिक्का वागवणाऱ्या अजगराला लोकांनी सोडलं नसतं. दुसरी गोष्ट म्हणजे, त्याला भीतीपोटीदेखील मारलं असतं. मला एवढा मोठा साप पकडायचा अनुभव नव्हता. म्हणून मी शांतपणे लाखनी या तालुक्याच्या ठिकाणी राहणारे सन्मित्र अशोक दिवाकर गायधने यांना फोन केला. जुजबी चौकशी करून अशोकजी म्हणाले –

'दादा, मी सर्पमित्रांना पाठवतो. थोडा वेळ लागेल. तरी कमीत कमी अर्धा तास लागेल. तुम्ही जागा सोडू नका!'

मी आणि लतीश अजगरावर बारीक लक्ष ठेवत सर्पमित्र यायची वाट बघत शेताच्या कडेला उभे राहिलो. आम्ही इतके शांत आणि स्थिर उभे होतो की, आता कोणत्याही क्षणी अजगर जागा सोडेल आणि बाहेर येईल असं वाटत होतं. तसं झालं असतं तर आमची पंचाईत झाली असती. कारण नंतर त्याला शोधून काढणं खूप अवघड गेलं असतं. लतीशनं त्याच्या धाकट्या भावाला, भाग्याभाऊला सब्बल (पहार) आणायला पाठवलं. मी शेजारच्या खाचरात भाताची कापणी करणाऱ्या गावातल्या महिलांकडे सापाची चौकशी केली. त्या म्हणाल्या की, धान कापत कापत आम्ही एका बांदीच्या कोपऱ्यात आलो तोच सरसर करत मोठा साप निघाला. आम्ही खूप घाबरलो. आरडाओरडा केला. आम्हाला काही कळायच्या आधीच तो साप गेलासुद्धा. सर्वात शेवटी त्या धुर्यावरच्या बिळात घुसताना आम्ही त्याला पाहिलं.

संध्याकाळी ५ वाजता माझा फोन वाजला. युवराज मनोहर बोबडे, गोविंद रामकृष्ण धुर्वे आणि बॉबी वासुदेव लांजेवार हे सर्पमित्र गावात आले होते. गावातून किशोरच्या शेतात कसं यायचं हे विचारत होते. आम्ही सर्पमित्रांना घेऊन येण्यासाठी, त्यांना वाट दाखवण्यासाठी गावातल्या दोन लहान मुलांना पिटाळलं. सर्वजण जागेवर पोहोचेपर्यंत उतरती वेळ झाली होती. आम्ही सर्पमित्रांना अजगराचं बीळ दाखवलं. अजिबात वेळ वाया न घालवता त्यांनी काम सुरू केलं. अजगराच्या डोक्याचा भाग नेमका कुठे होता हे मोबाईल टॉर्च वापरून पाहिलं. थेट त्या जागेवर पहार न मारता त्यांनी बाजूबाजूनं खणायला सुरुवात केली. अजगराला पहारीचं टोक लागून तो जखमी होणार नाही याची दक्षता घेणं आवश्यक होतं. मी पुन्हा पुन्हा सर्पमित्रांना 'काळजी घ्या रे बाबांनो, काळजी घ्या' अशी आर्जवं करत होतो. अजगराला कोणतीही जखम झाली असती, तर ती बरी होईपर्यंत त्याला बंदिवासात ठेवावं लागलं असतं. कारण एखाद्या सस्तन प्राण्यासारखी सापाला त्याची जखम चाटून चाटून बरी करता येत नाही. जखमी सापाची शुश्रूषा हा जरा किचकट प्रकार आहे. जखमेत जंतूसंसर्ग झालेला साप वाचणं, जगणं फार अवघड असतं. अजगराला लवकरात लवकर गावापासून दूर, नैसर्गिक अधिवासात सोडलं पाहिजे असा माझा आग्रह होता. जसजसं बीळ मोठं होऊ लागलं, तसतसं अजगराच्या लक्षात येऊ लागलं आणि तो आतल्याआत फिरू लागला. मोठ्या झालेल्या बिळात डोकावून पाहिलं तेव्हा त्याचं नक्षीदार शरीर सरकताना दिसू लागलं. एक वेळ अशी आली की, त्याला बाहेर यावंच लागलं. एक मोठी छलांग मारत अजगर बिळाच्या बाहेर आला आणि सटकायला लागला. युवराजनं चपळतेनं त्याला शेपटीकडून पकडलं. त्यानंतर काही सेकंदातच अत्यंत घाणेरडा वास सुटला. हा वास अजगराच्या गुदद्वाराजवळ असलेल्या एका ग्रंथीतून आला होता. या ग्रंथीला गुद्ग्रंथी (anal gland) म्हणतात. अत्यंत तणावाखाली असताना, संभाव्य नराला समागमासाठी आकर्षित करण्यासाठी (रासायनिक साद!) आणि स्वतःचा बचाव करण्यासाठी अजगराची मादी 'आगो बाबोऽऽ!' इतका घाण वास सोडते. याचा अर्थ, आम्ही पकडलेला अजगर ही मादी होती. हा वास नर सोडत नाही. अजगर हाताळणाऱ्या व्यक्तीच्या हाताला आणि अंगालादेखील काही तास हा वास येत राहतो. आपले हात वारंवार साबणानं धुतले तरीही हा वास टिकून राहतो.

सर्व प्रकारच्या कार्याची सुरुवात ही 'अर्थ' म्हणजेच संपत्तीपासून होते. - कौटिल्य




संध्याकाळच्या पिवळ्या उन्हात सुटकेसाठी हिंदोळणारा तो महासर्प बघून अक्षरशः डोळ्यांचं पारणं फिटलं. त्याचं सौष्ठव प्रेमात पडावं असं होतं. तो जरा शांत व्हावा म्हणून युवराजनं त्याचं तोंड जमिनीवर टेकवलं. जमिनीला स्पर्श होताच तो सरपटत हळूहळू पुढे जाऊ लागला. तेवढ्यात गोविंदानं वेगवान हालचाली करत गपकन् त्याची मान पकडली आणि सगळ्यांनी मिळून क्षणार्धात त्याला उचललं. आमची सायंकालीन अजगरयात्रा निघाली. माझ्या विनंतीला मान देऊन सर्पमित्रांनी अजगराला गावात आणलं. आम्ही जमलेल्या गावकऱ्यांना अजगर दाखवला. काही सर्पमित्रांच्या मदतीनं अजगरासारखा मोठा सापदेखील कसा अलगद उचलला हे सामान्य लोकांना कळावं म्हणून थोडा गारूडीपणाही केला. आता हा साप आम्ही दूरलांबच्या जंगलात सोडून देणार आहोत, हे मी गावकरी मंडळींना मुद्दाम मोठ्या आवाजात सांगितलं. सगळ्यांच्या समोर सर्पमित्रांचं कौतुक केलं. त्यांना शाबासकी दिली. गावात कुठेही, कोणताही साप दिसला तरी त्याला मारू नका, आम्हाला कळवा अशी विनंती सगळ्यांना केली.

तेवढ्यात, पहिल्यांदा अजगर बघणाऱ्या सर्व महिला त्यांचं काम संपवून गावात आल्या. श्रीमती मनी माधो पंधरे, सौ. कांता आनंदराव कोवे, श्रीमती मंजुळा रामेश्वर शिरसाम, सौ. शालू जनार्दन वलके, सौ. हेमलता किशोर टेकाम, सौ. हर्षा विजय टेकाम, श्रीमती वैशाली नंदेश्वर वलके, सौ. सुनीता संजय टेकाम या महिलांनी योग्य वेळी जागरुकता दाखवली नसती, तर हा तुंदपरिमृज वाचणं अशक्य होतं. अजगराला वाचवण्यात सर्वात मोठी भूमिका किशोर श्यामराव टेकाम याची होती. शेतात काम करणाऱ्या महिलांकडून अजगराची माहिती मिळताच किशोरनं ताबडतोब थेट शेतातून गावात फोन केला आणि लतीशला कळवलं.

यथावकाश, सर्पमित्रांनी या अजगराला मनुष्यवस्तीपासून दूर पानगळी प्रकारच्या एका जंगलात मुक्त केलं. सुमारे ५ फूट ६ इंच लांबीच्या अजगराचं वजन ६ किलो होतं.

**सणसणीत डोंगरयेल्या पकडला**

बुधवार दिनांक १३ ऑक्टोबर २०२१ रोजी दुपारी तालुक्याच्या ठिकाणी जाऊन काही महत्त्वाची कामं करून घरी आलो. जेवण केलं आणि जरा अंग टाकलं. डोळा लागणार तेवढ्यात 'किकाऽ, साप! किकाऽ, साप!' असा मुलांचा कोहोकाडा कानांवर आला. दारातली घंटाही खणखणू लागली. मी खूप दमलो होतो. उकाड्यामुळे जरा वैतागलो होतो. तरीही साप म्हटल्यावर ताडकन् उठलो. साप पकडायची काठी उचलून पायात सपाता अडकवल्या आणि निघालो. गावातली पोरं माझ्या पुढेच होती. मोजून तीन मिनिटांत 'निसर्गवेध' संस्थेतर्फे आम्ही लहान मुलांसाठी बांधत असलेल्या पाखरशाळेपाशी आलो.

पतिराम हरिराम उईके यांच्या घराच्या दारात सुमारे १० फूट उंचीचं कण्हेरीचं एक झाड आहे. दहा-पंधरा पोरं, दहा-बारा बाया आणि बाप्ये झाडाच्या भोवती जमा झाले होते.

'अजी, साप कोटी आये?' मी विचारलं.

'तो पाय, किका, तो पाय! तो तो. खाल्या फोकटीवर डोका मांडलानं तेना. पाय, पाय!'

असं म्हणत एकानं उत्साहानं मला तो साप दाखवला. डोक्याच्या मानानं मोठे डोळे असलेला. अफलातून मान वेळावत डोळ्यांनी बघत समोरच्या वस्तूची ओळख करून घेणारा. जरासा बिचकलेला. सावध झालेला. कण्हेरीच्या आतल्या भागात शाखा-उपशाखांवरून वाटा शोधत लीलया फिरणारा, एखाद्या वेलीच्या तुकड्यासारखा दिसणारा डोंगरयेल्या डोळ्यांमधून कोणतेही भाव व्यक्त करू शकत नाही. पण प्रसंगानुरूप मला तो भेदरल्यासारखा वाटत होता.

मी त्याला पकडण्यासाठी सर्पकाठीचा आकडा पुढे केला. आकड्याचा स्पर्श होताच त्यानं सपकन् तोंड फिरवलं आणि सळसळत तो दुसऱ्या बाजूला गेला. जन्मापासून निसर्गातील प्रत्येक हालचालीचा वेध घेणारे चोपन्न गोंडी डोळे त्याच्यावर लक्ष ठेवून होते. त्यामुळे तो कुठे गेला आहे, हे मला लगेच सांगितलं जात होतं.

'त्या आंगा गेला, त्या आंगा, तो पाय दादाऽऽऽ, तो पाय!'

तेवढ्यात महिला वर्गातून एक घाबराघुबरा आवाज आला -



'मोट्टा डगर आयेऽऽऽ. अबीऽऽऽ तो पाय. विसारी आयेऽऽऽ!'

झाडाच्या दुसऱ्या भागात गेलेला साप मी पुन्हा एकदा काठीवर घेण्याचा प्रयत्न केला. पुन्हा तेच झालं. त्यानं तोंड फिरवलं आणि झाडावरची जागा बदलली. जागा बदलून झाल्यावर तो एक युक्ती वापरत होता. जणू काही वारा पडल्यावर दिसणाऱ्या एखाद्या वेलीसारखा एकदम स्तब्ध होत होता. ही चाबकासारखं शरीर असणाऱ्या या सापाच्या स्नायूंची कमाल होती. त्यामुळे बघणाऱ्यानं काही सेकंद जरी त्याच्यावरची नजर काढली, तरी तो सापडत नव्हता. मी त्याला काठीवर घ्यायचा प्रयत्न करायचा हे लक्षात येताच त्यानं पीछेमूड करायचं आणि जागा बदलायची. हा प्रकार पाच-सहा वेळा झाला. विश्वास बसणार नाही इतक्या चपळ अशा सापानं कण्हेरीच्या बाजूला उगवलेल्या एका झेंडूच्या शेंड्यावर डोकं ठेवताच मला हालचाल करायला जागा मिळाली. मी पुढे सरसावलो आणि उजव्या हातानं त्याची शेपूट पकडली. शेपूट पकडताच स्वतःची सुटका करण्याच्या प्रयत्नात सापानं झेंडूवरची पकड सोडली आणि तो अधांतरी लटकू लागला. त्यानंतर सापानं जे काही केलं, त्याला 'मस्ती' हा शब्द चपखल बसेल. माझ्या हातातून सुटका करून घेण्यासाठी स्नायूंचा जोर लावणं, एकदम उडी मारल्यासारखी उसळी घेणं, स्वतःच्या भोवती गरगर फिरणं, अंगाला पिळे देणं, मध्येच उलट फिरून माझ्या हातावर येण्याचा प्रयत्न करणं, चावण्यासाठी क्षणभर जबडा उघडणं...

डिवचल्यामुळे चिडलेल्या सापानं त्याचे खवले पसरवले आणि जीव टाकावा असा त्याच्या कातडीचा निळा रंग झळकला. अहाऽहाऽऽ कमाल! साप हळूहळू शांत झाला आहे असं वाटत असतानाच तो जोर लावून झेपावत होता, उसळी मारत होता. त्याच्या हालचाली

फक्त बघत राहाव्यात अशा होत्या. मी त्याला घराकडे घेऊन येताना त्यानं सर्पकाठीला धामणगाठ मारली. मी त्याला किंचित मोकळीक देताच त्यानं एका दोडक्याच्या वेलीवर पकड मिळवण्याचा प्रयत्न केला. या साजिऱ्या सापाला पिशवीत कसं ठेवायचं हा प्रश्न होता. आमची सख्खी शेजारीण सौ. चंद्रकला रूपचंद भलावी हिनं तत्परतेनं कापडी पिशवी आणून दिली. उदेभान आसाराम शिरसाम या मित्रानं ती जमिनीवर पसरवून ठेवली. मी काठीवर उचलून धरलेला साप खाली आणला. काही सेकंदांमध्येच साप आपणहून पिशवीत गेला. मी पटकन् पिशवी उचलली आणि गाठ मारून तिचा गळा बंद केला.

हा सगळा खटाटोप कशासाठी केला? गावात शंभर लहान मुलं आहेत म्हणून त्यांच्या सुरक्षेसाठी. लोकांनी साप ठेवला नसता, म्हणून मी तो पकडला आणि गावतलावाच्या काठावर असलेल्या जंगलात सोडून दिला.



आज हा साप पहिल्यांदा शुभम पतिराम उईके याला दिसला. शुभम पाखरशाळेच्या बांधकामावर काम करत होता. अचानक त्याचं लक्ष आंब्याच्या झाडाकडे गेलं आणि त्याला हा साप दिसला. त्यावेळी तो साप आंब्याच्या झाडावर चढत होता. सापानं शुभमच्या देखत अप्रतिम झेप घेत खालच्या फांदीवरची एक पाल पकडली. डोळे मोठे करून याचं वर्णन करताना शुभम म्हणाला –

'दादाऽऽऽ काय सांगावा? मी झाडावर वर-खाली करणारा साप बघत होतो. पन येक वेड अशी आली की तो वरच्या खांद्यावरून कुदला, तो डायरेट इज्गूरवर. मी तर बगतच रायलो!'

इज्गूर म्हणजे पाल.

पाल गिळल्यानंतर इकडून तिकडे जाण्यासाठी शेजारी शेजारी वाढलेल्या झाडांच्या शाखा-उपशाखांचा सेतू नसल्यामुळे तो आंब्याच्या झाडावरून सरळ खाली उतरला. पाखरशाळेच्या भिंतीला खेटून सरपटत गेला आणि इथून सर्वात जवळ असलेल्या कण्हेरीच्या झाडावर चढला.

(क्रमशः)

**– किरण वसंत पुरंदरे**
मोबाईल नं. ९७६५८१८८२५

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

**वेशभूषा दिवस (Fancy Dress Day)**

२ मार्च - सिनियर के. जी.

३ मार्च - नर्सरी व ज्युनियर के. जी.

या दिवशी आभासी (online) पद्धतीने वेशभूषा दिवस साजरा झाला. नर्सरी व ज्युनियर के. जी. साठी कोणताही आरामदायक पोषाख (Any comfortable costume)

- यामधे नर्सरीच्या मुलांनी पोलिस, पक्षी, भाजीवाली, वैमानिक, डॉक्टर. तर -

- ज्युनियरच्या मुलांनी विविध फळे, भाज्या, शिक्षक, झाशीची राणी अशा वेशभूषा परिधान केल्या होत्या.

- सिनियरच्या विद्यार्थांना कोणतीही जाहिरात, मानवनिर्मित (man made) किंवा निसर्ग निर्मित (natural) गोष्टींचा वेष असे विषय देण्यात आले होते. अमूल बटर, डेटॉल या सारख्या जाहिरातीचे सुंदर सादरीकरण मुलांनी केले. सूर्य, पाणी, माती, प्राणी इत्यादी निसर्गनिर्मित तर इमारती, संगणक या सारख्या मानवनिर्मित वस्तूंची वेशभूषा करून त्याबद्दल माहिती दिली.

**इतर उपक्रम**

**सिनियर के. जी.**

**५ मार्च – ड्रॉपरचा उपयोग**

ड्रॉपरच्या सहाय्याने एका भांड्यातून दुसऱ्या भांड्यात पाणी भरणे.

**८ मार्च – पोळ्या लाटणे**

पालकांच्या मदतीने व शिक्षकांच्या सूचनांप्रमाणे पोळ्या करण्याचा मनमुराद आनंद मुलांनी पुन्हा एकदा घेतला.

**११ मार्च – चिकणमातीचे खेळ (Clay Modelling)**

**१५ मार्च – कारल्याच्या सहाय्याने ठसेकाम**

कारल्याच्या सहाय्याने विविध रंग वापरून मुलांनी होळीनिमित्त ठसेकाम (printing) केले.

**ज्युनियर के. जी.**

**१७ मार्च – स्पंजने ठसेकाम (Spong printing)**

स्पंजचे आयताकृती तुकडे वेगवेगळ्या रंगांत बुडवून होळीनिमित्त मुलांनी ठसेकाम केले.

**नर्सरी**

**१६ मार्च –** नर्सरीच्या विद्यार्थ्यांनी दोन ताटल्यांमधे असलेले रंगाचे ढीग शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली रंगवले. (होळी निमित्त)

**बाहुल्यांच्या (Puppets) सहाय्याने गोष्ट –**

११ मार्च - नर्सरी

२५ मार्च ज्युनियर के. जी.

पुस्तके वाचून, चित्रांचा वापर करून मुलांना गोष्टी सांगितल्या जातात. प्राणी, पक्षी यांचे पपेटस् वापरून मुलांना सांगितलेली गोष्ट त्यांना वेगळाच आनंद देते. 'आभाळ फाटल' ही ससा व इतर प्राण्यांची गोष्ट मुलांना पपेटस् वापरून सांगितली गेली.

---

यशस्वी होणं याचा अर्थ कधीही अपयश न मिळणं असा नसून, अंतिम ध्येय गाठणं असा आहे. - एडविन सी. ब्लिस

**सुरक्षा उपाय (Safety Measures) – चांगला किंवा वाईट स्पर्श (Good and Bad Touch)**

२३ मार्च – नर्सरी व ज्युनियर के. जी.

२४ मार्च – सिनियर के. जी.

मुलांना या विषयीची माहिति व त्या पासून घेण्याची काळजी याची कल्पना शिक्षकांनी दिली.

१ एप्रिल – २ एप्रिलला येणारा गुढीपाडवा म्हणजे हिंदू नवीन वर्ष या सणाचे महत्त्व व वैशिष्ट्य, गुढीचे महत्त्व, शिक्षकांनी मुलांना सांगितले.

**२८ मार्च ते ८ एप्रिल – दुसरे निरीक्षण (II Observation)**

मुलांचे या शैक्षणिक वर्षातील दुसरे निरीक्षण प्रत्यक्ष शाळेत येऊन (Offline) घेण्यात आले. वर्षभर शिकवण्यात आलेल्या सर्व विषयांतील संकल्पनांची चाचणी घेण्याच्या कार्यपत्रिका (Worksheets), तसेच कृती व तोंडी अशा पद्धतीने हे निरीक्षण घेण्यात आले.

**२९ एप्रिल – वार्षिक निकाल**

नर्सरी – सकाळी १०:३० ते ११:००

ज्युनियर के. जी. – सकाळी ११:०० ते ११:३०

सिनियर के. जी. – सकाळी ११:३० ते १२:००

दुसऱ्या निरिक्षणा दरम्यान मुलांनी सोडवलेल्या कार्यपत्रिका (Worksheets) पालकांना या वेळेत बघता आल्या. तसेच दुसऱ्या निरिक्षणाचे प्रगती पुस्तक (report card) या दिवशी पालकांना देण्यात आले.

अशा तऱ्हेने जून ते जानेवारी आभासी (Online) तर फेब्रुवारी व मार्च या दोन महिन्यात प्रत्यक्ष (Offline) पद्धतीने हे शैक्षणिक वर्ष पार पडले. शाळेच्या शेवटच्या दिवशी काही पालक प्रतिनिधींनी या सर्वांबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच शिक्षकांचे व शाळेचे आभार मानले.

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

**संस्कृत स्वरांजली – जीवनस्य नवरसाः**



विद्या प्रसारक मंडळाचे जोशी – बेडेकर स्वायत्त महाविद्यालयातर्फे टॅलेंट व कल्चरल कमिटी आणि संस्कृत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'संस्कृत स्वरांजली' हा कार्यक्रम २८ एप्रिल २०२२ रोजी दुपारी ३ वाजता विद्या प्रसारक मंडळाच्या पाणिनी सभागृहात आयोजित करण्यात आला होता. संस्कृत भाषेचा प्रसार, प्रचार, तसेच विद्यार्थ्यांमध्ये संस्कृत भाषेविषयी आत्मीयता निर्माण व्हावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जीवनस्य नवरसः या नाट्य, नृत्य व संगीत यांचा मिलाफ असलेल्या या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेतून नाट्य सादर करण्याची संधी मिळाली.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, सौ. सुमेधा बेडेकर, डॉ. प्रसाद भिडे, (लेखक, दिग्दर्शक, संगीतकार), डॉ. वैशाली दबके, संस्कृत विभागप्रमुख, रुईया महाविद्यालय, श्री. व्ही. नारायण संघटनमंत्री, संस्कृत भारती ठाणे जिल्हा, सौ. वंदना कुणकीकर, गीता अभ्यासक, सौ. ऋतुजा वेलणकर, प्राचार्या, सुरवणी ज्ञान मंदिर, ठाणे, प्रा. राधिका देशपांडे, संस्कृत विभाग, मुंबई विद्यापीठ, तक्षील खानविलकर, मराठी व संस्कृत नाट्यदिग्दर्शक व अभिनेता असे विविध मान्यवर, संस्कृत भाषा तज्ज्ञ व विद्वान मंडळी या

आवश्यक गोष्टींपासून सुरुवात करा. नंतर आपल्या आटोक्यात येतील अशा गोष्टी करा. शेवटी तुमच्या लक्षात येईल की, आपण अशक्य वाटणाऱ्या गोष्टीही करू लागलो आहोत! – सेंट्र फ्रान्सिस ऑफ असिसी

कार्यक्रमास उपस्थित होती. विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ सदस्य जयंत कयाळ, तसेच विद्या प्रसारक मंडळाच्या इतर महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य या कार्यक्रमास उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात बोलताना जोशी - बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी संस्कृत भाषेचे महत्त्व विशद करताना असे संस्कृत भाषेतील विविध कार्यक्रम सातत्यपूर्ण व्हावेत, ज्यामुळे या भाषेविषयी आत्मीयता निर्माण होईल, असे वक्तव्य केले. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी विद्यार्थ्यांना आशीर्वाद देताना विद्यार्थ्यांच्या कृतिशील व सर्जकतेचे कौतुक केले. जगभर विविध ठिकाणी संस्कृत परिषदा आयोजित केल्या जातात. अशा परिषदांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे सुचवले.

नवरस या विषयावर आधारित असलेल्या प्रस्तुत कार्यक्रमात नाटक, नृत्य, संगीत असा संस्कृत भाषेतील त्रिवेणी संगम रसिकांना अनुभवता आला. संपूर्ण कार्यक्रम अर्थात संवाद, गीत, नाट्य संस्कृत भाषेत होते. रसिकांनी कार्यक्रमास भरभरून दाद दिली. डॉ. विजय बेडेकर यांच्या पत्नी सौ. सुमेधा बेडेकर यांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्तपणे २५ हजारांची देणगी घोषित केली. असे दर्जेदार कार्यक्रम अजून व्हावेत, यासाठी त्यांनी प्राध्यापक व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

सदर कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी, तसेच इतर इच्छुक रसिक असे २०० हून अधिक प्रेक्षक उपस्थित होते. मुद्रित, युट्यूब वृत्तवाहिनीचे पत्रकारही कार्यक्रमास उपस्थित होते. ऑफलाईन, तसेच झूम, युट्यूब लाईव्ह माध्यमातून ऑनलाईनही या कार्यक्रमाचा आस्वाद रसिक प्रेक्षकांनी घेतला.

प्रस्तुत कार्यक्रमाची संकल्पना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांची असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी युवराज ताम्हनकर यांनी या कार्यक्रमाचे लेखन व दिग्दर्शन केले. ३५ कलाकारांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

टॅलेंट आणि कल्चरल कमिटी समन्वयक डॉ. मुग्धा बापट यांच्या मार्गदर्शनाखाली टॅलेंट आणि कल्चरल कमिटीचे सर्व प्राध्यापक व ३० विद्यार्थी स्वयंसेवक यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. संस्कृत विभाग प्रमुख प्रा. स्वाती भालेराव यांनी या कार्यक्रमाचे संस्कृत भाषांतर केले असून त्यांनी संस्कृत भाषेत कार्यक्रमाचे निवेदन केले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

**'ऋत' या वार्षिक वृत्तपत्राचे प्रकाशन**




जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या 'ऋत' या वार्षिक वृत्तपत्राचे प्रकाशन गुरुवारी, ५ मे रोजी कात्यायन सभागृहात पार पडले. या वर्षीच्या वृत्तपत्राची संकल्पना '७५ आझादी का अमृत महोत्सव' होती. वृत्तपत्रातील लेखांमध्ये भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या पंच्याहत्तर वर्षांत बदललेल्या विविध पैलूंचा समावेश आहे. ऋतच्या प्रकाशनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून साम टीव्हीचे कार्यकारी संपादक प्रसन्न जोशी लाभले होते. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विजय बेडेकर आणि जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक हे देखील उपस्थित होते. उपप्राचार्य व जनसंवाद आणि पत्रकारिता विभागाचे समन्वयक डॉ. महेश पाटील, ऋतचे समन्वयक डॉ. प्रशांत धर्माधिकारी आणि डॉ. विमुक्ता राजे, प्राध्यापिका मानसी जंगम आणि

क्षेत्र कोणतंही असो, हाती घेतलेल्या कामावरील निष्ठा आणि ते सर्वोत्कृष्ट असंच करण्याचा त्याचा ध्यास या दोन गोष्टींवर माणसाच्या जीवनाची कृतार्थता अवलंबून असते. - व्हिस लोंबार्डी

डॉ. संगीता मोहंती, तसेच महाविद्यायाच्या इतर विभागांचे समन्वयक व शिक्षक या कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली, त्यानंतर डॉ. विजय बेडेकर आणि डॉ. सुचित्रा नाईक यांचे, 'पत्रकारितेतील वाचनाचे महत्त्व आणि नीतिमूल्ये' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर मुख्य संपादक नितीश चव्हाण, इंग्रजी विभाग संपादक गंधर्व पुरोहित, मराठी विभाग संपादक मैथिली फडके यांनी त्यांचे अनुभव मांडले. साम टीव्हीचे कार्यकारी संपादक प्रसन्न जोशी यांनी नंतर विद्यार्थ्यांना 'पत्रकार आणि संवादक' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी एखाद्याच्या जीवनातील संवादाचे महत्त्व याविषयी चर्चा केली आणि एक चांगला संवाद साधणारी व्यक्ती त्याचे जीवन कसे घडवू शकते याविषयीही सांगितले. जर सामग्री राजा असेल, तर वितरण ही राणी आहे आणि संप्रेषण हा मार्गदर्शक आहे, असे देखील ते म्हणाले. त्याचबरोबर आजच्या सोशल मीडियाच्या युगात प्रभावी संवादक कसे व्हावे याविषयी त्यांनी सर्वांना माहिती दिली. जर तुम्हाला संवादक बनायचे असेल तर तुम्ही कोणत्या प्रकारची सामग्री तयार करू शकता यावर कोणतेही निर्बंध नाहीत. प्रेक्षकांना हवी असलेली सामान्यतः उपलब्ध नसलेली सामग्री दाखवा. लोकांशी नवीन मार्गाने संवाद साधा, मग ते आपोआप तुम्हाला समर्थन देतील हे त्यांनी सांगितले.

आजच्या जगात समाजमाध्यमांवर असणे गरजेचे आहे आणि समाजमाध्यमांवर आपले व्यक्तिमत्त्व स्थापित केले पाहिजे. संवादक असण्यासाठी भाषा हा एक आवश्यक घटक आहे. त्याही बद्दल त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात प्रसन्न जोशी यांच्या हस्ते पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. शेवटी पसायदानाने कार्यक्रम संपन्न झाला.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

### मुंबई विद्यापीठातर्फे बांदोडकर महाविद्यालयातील एन. एस. एस. युनिटचा सत्कार

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (एन. एस. एस.) युनिटचा मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुहास पेडणेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




### यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक अंतर्गत विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक अंतर्गत बा.ना.बांदोडकर महाविद्यालय येथे दरवर्षी (२०१९ पासून) पत्रकारिता अभ्यासक्रम आणि ग्रंथालय शास्त्र अभ्यासक्रम वर्गाचे माजी विद्यार्थी यांचे स्नेहसंमेलन आयोजित केले जाते. यावर्षी दिनांक २३ /०४/ २२ रोजी संध्याकाळी सहा ते आठ दरम्यान जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. यावेळी पत्रकार, ग्रंथपाल, माजी विद्यार्थी संमेलनासाठी उपस्थित होते.

समाजात दुही माजवून तुम्ही बंधुभाव निर्माण करू शकणार नाही. कमाईपेक्षा जास्त खर्च कराल तर मग त्यातून उद्भवणाऱ्या समस्येपासून तुम्ही दूर राहू शकणार नाही. - अब्राहम लिंकन

सर्वप्रथम ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. रंगनाथन यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले होते. कार्यक्रम प्रास्ताविक यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक मुख्य केंद्र संयोजक आणि बा. ना. बांदोडकर महाविद्यालय ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

नंतर झी मराठी वाहिनीवरील सारेगमप फेम गायिका जयश्री कांदळकर यांनी शिव छत्रपती महाराज यांच्यावर आधारित एक सुंदर, प्रेरणादायी गीत सादरीकरण केले होते. माजी विद्यार्थी मुकुंद यांनी केंद्र संयोजक कादंबरी मांजरेकर मॅडम आणि यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक यांचे आभार मानले, कारण ग्रंथालय शास्त्र अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण करून सेट परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत. केवळ या केंद्राच्या माध्यमातून. त्यांनीही खास उपस्थिती लावून मनोगत व्यक्त केले. नेरळ या ग्रामीण भागातील एक माजी विद्यार्थींनी जागृती घारे हिने शिक्षण पूर्ण झाल्यानंतरही फक्त चूल आणि मूल सांभाळत होती. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक अंतर्गत ठाणे केंद्रातील ग्रंथालय शास्त्र अभ्यासक्रम पूर्ण करून स्वतःच्या पायावर उभी राहिली. सेट परीक्षा उत्तीर्ण करून पी.एच.डीची तयारी करीत आहे असे मनोगत व्यक्त केले.

मनीषा चव्हाण यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व सोबत एक द. मा. मिरासदार यांची एक विनोदी कथा अभिवाचन केले.

अशा कार्यक्रमातून माजी विद्यार्थी प्रत्यक्ष भेट घडावी व नवे उपक्रम सुरू व्हावे सर्व उपस्थित सदस्यांचे एकमत झाले. लॉकडाऊन नंतर प्रत्यक्ष भेटीतून विचारांची देवाणघेवाण झाली. आनंद व समाधान व्यक्त करत सर्व माजी विद्यार्थी नवी ऊर्जा घेऊन घरी परतले.





**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन**

**विद्यामंडलक क्लब**

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाचे विद्यामंडलक क्लब आणि माझे ग्रंथालय ग्रंथपेटी योजना यांच्या संयुक्त विद्यमाने २३ एप्रिल २०२२ रोजी जागतिक पुस्तक दिनानिमित्त नाटककार शेक्सपियर या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला श्री. प्रदीप कुलकर्णी हे प्रमुख वक्ते म्हणून लाभले होते.

श्री. प्रदीप कुलकर्णी यांची आजवर चार पुस्तके प्रकाशित झाली आहेत. ते सध्या नाटककार शेक्सपियर यावर एक पुस्तक लिहीत आहेत. शेक्सपियर यांच्या लिखाणाचा सखोल अभ्यास त्यानी केला आहे. 'Merchant of Venus' या पुस्तकावरून त्यांना नाटककार शेक्सपियर हे पुस्तक लिहिण्याची कल्पना सुचली.

---

सामान्य माणूस आपल्या शक्तीच्या आणि क्षमतेच्या फक्त एक चतुर्थांशच काम करतो. जी माणसं आपल्या क्षमतेच्या निम्म्याहून अधिक क्षमतेनं कामं करतात त्यांना जग सलाम करतं! - अँड्र्यू कार्नेगी

शेक्सपियर यांनी ३७ नाटके लिहिली ज्यामध्ये १७ सुखांतिका, १० शोकांतिका आणि १० ऐतिहासिक नाटके यांचा समावेश आहे. या ३७ नाटकांचा श्री. प्रदीप कुलकर्णी यांनी थोडक्यात परिचय करून दिला. या कार्यक्रमाला एकूण २५ जणांनी आपला सहभाग नोंदवला.





**विद्या प्रसारक मंडळाचे**
**ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

**प्रथमवर्ष ऑफलाइन व्याख्यान**

७ एप्रिल २०२२ पासून प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे सत्र - एकचे लेक्चर ऑफलाइन पद्धतीने घेण्यात आले. सीईटी सेलच्या सामायिक प्रवेश प्रक्रियेमुळे प्रथम वर्षाच्या प्रवेशांना कमालीचा उशीर झाला आणि म्हणून २४ फेब्रुवारी २०२२ पासून व्याख्याने सुरू झाली.

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा**

आमचे महाविद्यालय ३ एप्रिल २०२२ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचे केंद्र होते.

**GST मध्ये सराव वर ऑनलाइन विशेष व्याख्यान**

६ एप्रिल रोजी माजी विद्यार्थी अधिवक्ता श्रीनिवास साठ्ये यांना जीएसटीच्या सरावावर विद्यार्थ्यांना संबोधित करण्यासाठी आमंत्रित केले होते. श्री. साठ्ये यांनी खास तयार केलेल्या पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनसह विद्यार्थ्यांना संबोधित केले. विद्यार्थी या विषयावरील मार्गदर्शनाचे कधीही कौतुक करतील.

**१६ वे डॉ. वा. ना. बेडेकर स्मरणार्थ विधी वादविवाद स्पर्धा**

दिनांक ९ एप्रिल २०२२ रोजी विद्या प्रसारक मंडळाचे ठा.न.पा. विधी महाविद्यालय तर्फे १६ वे डॉ. वा. ना. बेडेकर स्मरणार्थ विधी वादविवाद स्पर्धेचे आभासी माध्यमातून आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये एकूण ९ महाविद्यालयांनी भाग घेतला होता. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून ॲड. डॉ. अमिषा सावला आणि सिनियर ॲड. श्री. आशिष गोगटे यांनी परीक्षण केले. या स्पर्धेचे विषय खालील प्रमाणे होते.

**स्पर्धेचे विषय**

१) सरोगसीला परहितवादी सरोगसी पुरते मर्यादित करणे हे संविधानिक अधिकसरांचे उल्लंघन आहे.

२) महिला आरक्षण विधेयक मंजूर न होणे हे लैंगिक न्यायात अपयशी ठरत आहे.

या स्पर्धेचे विजेते खालील प्रमाणे :

**उत्कृष्ट वक्ता :**

प्रथम - संयोग पेडणेकर (प्रतिवादी), वसंत दादा पाटील प्रतिष्ठान विधी महाविद्यालय, मुंबई

द्वितीय - रचना धनराजानी (प्रतिवादी), नारी गुरसहानी विधी महाविद्यालय, उल्हासनगर

तृतीय - मोनिका नेमानी (वादी), व्ही. पी. एम. टी. एम. सी. विधी महाविद्यालय, ठाणे

**उत्तेजनार्थ**

सोनिया मिश्रा (प्रतिवादी), व्ही. पी. एम. टी. एम. सी. विधी महाविद्यालय, ठाणे

रामशंकर दशरथ सिंग (प्रतिवादी), भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय

एखादा माणूस शूर, हिंमतवान ठरतो तो इतरांपेक्षा अधिक धैर्यवान असतो म्हणून नाही; तर इतरांपेक्षा धैर्य दहा-वीस मिनिटे जास्त टिकवतो म्हणून. - राल्फ वाल्डो इमर्सन

**उत्कृष्ट टीम :**

प्रथम – नारी गुरसहानी विधी महाविद्यालय, उल्हासनगर

द्वितीय – व्ही. पी. एम. टी. एम. सी. विधी महाविद्यालय, ठाणे

तृतीय – वसंत दादा पाटील प्रतिष्ठान विधी महाविद्यालय, मुंबई

**बार कौन्सिल ऑफ इंडिया लीडर कॉन्फरन्स**

१४ एप्रिल रोजी प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार आणि अंतिम वर्षाचे २० विद्यार्थी ठाणे बार असोसिएशन आणि बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांनी आयोजित केलेल्या एक दिवसीय परिषदेत सहभागी झाले होते. ठाण्यातील घाणेकर सभागृहात हा कार्यक्रम झाला. सर्वोच्च न्यायाधीश माननीय न्यायमूर्ती अभय ओक यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले.

**माननीय न्यायमूर्ती अभय ओक यांचे विशेष भाषण**

विद्या प्रसारक मंडळाच्या टी एम सी विधी महाविद्यालयाने दिनांक १६ एप्रिल २०२२ सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्री. अभय ओक यांचे व्याख्यान प्रांगणातील बाजीराव पेशवे सभागृह इथे आयोजित केले होते. विधी शिक्षण आणि या क्षेत्रातील संधी या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, श्री. जे ऐन कयाल, श्री. बेंद्रे आणि महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार मंचावर उपस्थित होते. विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या या व्याख्यानासाठी अनेक विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती. तसेच मुंबई उच्च न्यायालयाचे व ठाणे जिल्हा न्यायालयाचे अनेक वकील, माजी विद्यार्थी, प्राध्यापक व विद्या प्रसारक मंडळाच्या इतर महाविद्यालयाचे प्रमुख देखील यावेळी उपस्थित होते.

सर्व प्रथम एन. सी. सी. च्या विद्यार्थ्यांनी श्री. अभय ओक यांना मानवंदना दिली आणि यानंतर दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी पाहुण्याची ओळख करून दिली तसेच विधी महाविद्यालयाचा ५० वर्षांचा इतिहास थोडक्यात सांगितला. डॉ. विजय बेडेकर यांनी अध्यक्षीय भाषण केले. न्यायमूर्ती अभय ओक यांनी विद्यार्थ्यांनी कशाप्रकारे विधीचा अभ्यास करावा, कोणती पुस्तके वाचावीत, तसेच एल एल बी ची पदवी प्राप्त केल्यानंतर कोणकोणत्या संधी मिळू शकतात याचे मार्गदर्शन केले. यावेळी अनेक मोठमोठ्या वकिलांचे व न्यायाधीशांचे अनुभव सांगून विधीचे विद्यार्थी कशाप्रकारे समाजाच्या विकासामध्ये हातभार लावू शकतात यावर मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी न्यूनगंड बाळगू नये असे न्यायमूर्तींनी सांगितले. आपल्या घरात आपण पहिलेच वकील आहोत त्यामुळे आपला व्यवसाय चालेल का नाही ही भीती मनात ठेऊन न्यायालयात जाऊ नये असे आवाहन त्यांनी यावेळी केले. पक्षकार हे वकिलांच्या मेहनतीला, अभ्यासाला आणि प्रामाणिकतेकडे बघून काम देतात त्यामुळे अशी भीती मनात ठेवायचे कारण नाही. नवीन वकिलांनी या व्यवसायात आल्यानंतर धैर्य ठेवावे, मेहनत करत रहावी व ज्या दिवशी संधी मिळेल त्याचे सोने करावे असेही त्यांनी यावेळी सांगितले. विद्यार्थांनीही यावेळी अनेक प्रश्न विचारले. त्या सर्व प्रश्नांची उत्तरे न्यायमूर्ती अभय ओक यांनी यावेळी दिली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. हेतल मिशेरी आणि प्रा. रश्मी नाटेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. विनोद एच वाघ यांनी केले.



## आधुनिक भारतीय संसदीय अधिवेशन (MIPS)

विद्या प्रसारक मंडळाच्या टी एम सी विधी महाविद्यालय, ठाणे आणि रोटरी क्लब, ठाणे यांच्या विद्यमाने दिनांक २३, एप्रिल, २०२२ रोजी महाविद्यालयामध्ये अभिरूप भारतीय संसदीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळेस महाविद्यालायाच्या सभागृहास लोकसभेचे स्वरूप देण्यात आले होते. एखादा कायदा मंजूर करताना त्यांचे बिल लोकसभेसमोर मांडले जाते तशी प्रक्रिया अभिरूप पद्धतीने या वेळेस राबविली गेली व तंतोतंत लोकसभेचा आभास निर्माण करण्यात आला. रोटरी क्लबचे सदस्य यांनी सभापती म्हणून काम बघितले. यावेळेस आमच्या महाविद्यालयाचे आणि इतर महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांनी यामध्ये भाग घेऊन विविध मंत्री पदाची जवाबदारी पार पाडली. उत्कृष्ट मंत्री, उत्कृष्ट वादविवाद (विरोधी), उत्कृष्ट संसद, उत्कृष्ट वेशभूषा अशी बक्षिसे रोटरी क्लबद्वारे देण्यात आली. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना खालील बक्षिसे देण्यात आली. रोटेरीयन डिस्ट्रिक्ट अध्यक्ष म्रीनल सुर्वे यांनी सर्व समन्वय साधला. आमच्या महाविद्यालयातील विध्यार्थ्यांना खालील बक्षिसे देण्यात आली.

- सर्वोत्कृष्ट संसद – नीलाक्षी त्रिपाठी (प्रथम वर्ष विधी)
- सर्वोत्कृष्ट मंत्री – क्षितिजा खंगटे (द्वितीय वर्ष विधी)



## सेमिस्टर १ अंतर्गत परीक्षा आणि प्रात्यक्षिक प्रशिक्षण परीक्षा

१८ एप्रिल, २०२२ अंतर्गत पहिली संधी

२८ एप्रिल, २०२२ अतिरिक्त संधी

२२ एप्रिल, २०२२ प्रात्यक्षिक प्रशिक्षणाची पहिली संधी

३० एप्रिल, २०२२ व्यावहारिक प्रशिक्षण दुसरी संधी

## प्राणी संरक्षण कायदे बॅच २ परीक्षा

प्राणी संरक्षण कायदे बॅच २ ची परीक्षा २९ आणि ३० एप्रिल २०२२ मध्ये घेण्यात आली.

**संयुक्त संचालकांनी बैठक बोलावली** – १३ एप्रिल सकाळी ११.३०.वा

## ग्रीन कॅम्पस कार्यशाळा २६ एप्रिल दुपारी १२ वाजता

दिनांक २६ एप्रिल, २०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता माननीय सहसंचालक, पनवेल यांनी ग्रीन कॅम्पस कार्यशाळेचे आयोजन केले होते. आमच्या महाविद्यालायाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी या कार्यशाळेला हजेरी लावली. या कार्यशाळेच्या अनुषंगाने स्टाफच्या बैठका घेण्यात आल्या आणि आराखडा तयार करण्यात आला. २८ एप्रिल, २०२२ रोजी प्राचार्यांनी महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन कॅम्पसला ग्रीन कॅम्पस बनवण्याचे आणि पर्यावरण कसे स्वच्छ ठेवावे यासाठी आराखडा तयार करण्याचे काम सोपवले.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

१) ''इंधनाची कमतरता'' हा अतिशय महत्त्वाचा विषय आहे. जीवाश्म इंधन कालांतराने मानवाच्या अति वापराने नष्ट होणार आहे. वेगळ्या विचारांनी व कल्पकतेने या विषयावर तोडगा काढणे आवश्यक आहे; जो पर्यावरण पूरक असेल. या विचारांनी अनुसरून विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाने २८ वी राष्ट्रीय परिषद दिनांक १६ एप्रिल २०२२ रोजी Online Platform वर आयोजित केली.

''Battery Electrical Vehicle and Related Technologies'' या विषयावर ही राष्ट्रीय परिषद संपन्न झाली. Zoom link व You tube link वरून वरील कार्यक्रमाचे सादरीकरण झाले. औद्योगिक जगतातील मान्यवरांनी या परिषदेला मार्गदर्शन केले. या विषयाला अनुसरून 'Poster Presentation Competition' चे आयोजन केले होते. विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्यांनी व इतर तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेचा व परिषदेचा लाभ घेतला.

२) विद्यालंकार तंत्रनिकेतन (मुंबई) आयोजित Project Competition (२३ एप्रिल २०२२) मध्ये Information Technology विभागातील रुचिता दळवी, विनय सूर्यराव, कीर्ती इपानपेल्ली (तृतीय वर्ष) ''IoT baded home automation system'' या प्रकल्पाला द्वितीय पारितोषिक मिळाले.

३) दिनांक ३० एप्रिल २०२२ रोजी विद्यार्थिनींचे भाऊसाहेब वर्तक पॉलीटेक्निक कॉम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक्स विभागासाठी प्रश्नमंजुषेचे आयोजन केले. या स्पर्धेत कॉम्प्युटर विभागाच्या पुढील विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली.

**प्रथम पारितोषिक**

शिवानी बोडके – द्वितीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअर
वैष्णवी बोरकर – द्वितीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअर

**तृतीय पारितोषिक**

सार्थक तिवाड – द्वितीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअर
सायमा खान – द्वितीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअर

४) VPM's Sports Academy, Stridgers and VPM's Joshi-Bedekar College (स्वायत्त) ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १ मे २०२२ रोजी सकाळी ६.३० ते ७.३० दरम्यान ''Maharashtra Din Walking Challenge'' या विषयांतर्गत विद्या प्रसारक मंडळाच्या संलग्न असलेल्या शिक्षकवर्गानी यात सहभाग दर्शविला.

या स्पर्धेत विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील प्राचार्य डॉ. डी. के नायक यांना रौप्यपदक व Instrumentation Engineering विभागाच्या प्रमुख सौ. वैशाली जोशी यांना कांस्यपदकाने सन्मानित केले.

५)''Re-Invention and Re-Engineering of Government Libraries : Trends, Issues and Challenge CRRG-TLC 2022 या International Conference of Central Government Library Association'' ने आयोजित केलेल्या परिषदेला डॉ. सौ. गीताली इंगवले यांनी सहभाग घेतला. सदर परिषद ऑनलाईन मोडवर एप्रिल २२ व २३, २०२२ रोजी आयोजित केली होती.

६) २२ एप्रिल हा ''जागतिक वसुंधरा दिन'' सर्वत्र साजरा केला जातो. पृथ्वीवरील हवामानामध्ये होणारा बदल व त्यामुळे होणारे दुष्परिणाम याविषयी जागृतता आणण्यासाठी सर्वत्र विविध कार्यक्रम राबविले जातात. विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात ISTE Chapter 2022 ने हा दिन घोष वाक्यांच्या स्पर्धेने साजरा केला.

तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्यांनी हा दिन उत्साहात साजरा केला. स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे –

शिवानी बोडके – द्वितीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअर – प्रथम पारितोषिक

प्रणम्य जोशी – प्रथम वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअर – द्वितीय पारितोषिक

मुकुंद सोनार – प्रथम वर्ष इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स – द्वितीय पारितोषिक

आनंदी जाधव – प्रथम वर्ष कॉम्प्युटर इंजिनिअर – तृतीय पारितोषिक

अक्षता नंदवलकर – प्रथम वर्ष इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी – तृतीय पारितोषिक

मुग्धा सरपन्डे – द्वितीय वर्ष इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स – उत्तेजनार्थ पारितोषिक


**इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टम विभाग**

**'बॅटरी इलेक्ट्रिक वाहने आणि संबंधित तंत्रज्ञान' या विषयावर २८ वी राष्ट्रीय परिषदचा अहवाल १६ एप्रिल २०२२ (ऑनलाइन मोड)**

V.P.M. पॉलिटेक्निक ठाण्याच्या इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टम विभागाने १६ एप्रिल २०२२ रोजी झूम ऑनलाइन मीटिंग आणि यू ट्यूब लाईव्ह स्ट्रीमिंगमध्ये २८ वी राष्ट्रीय परिषद ''बॅटरी इलेक्ट्रिक वाहन संबंधित तंत्रज्ञान'' आयोजित केली होती. संशोधक, अभियंते, उत्पादक आणि अभ्यासक यांना बॅटरी इलेक्ट्रिक वाहने आणि संबंधित तंत्रज्ञानातील प्रगती आणि विकास सामायिक करण्यासाठी आणि चर्चा करण्यासाठी एकत्र आणणारे व्यासपीठ प्रदान करणे हा या परिषदेचा उद्देश होता.




उद्घाटन सत्र : परिषदेचे उद्घाटन प्रमुख पाहुणे आणि प्रमुख वक्ते डॉ. शंकर वेणुगोपाल उपाध्यक्ष, महिंद्रा रिसर्च व्हॅली, चेन्नई यांच्या हस्ते झाले. त्यांनी कॉन्फरन्सची कार्यवाही प्रसिद्ध केली आणि बॅटरी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करून शाश्वत गतिशीलता साध्य करण्यासाठी एक दृष्टीकोन या विषयावर त्यांचे विचार सामायिक केले.




व्हिजन मेकॅट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेडच्या संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक, बॅटरीवाली ऑफ इंडिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ. राशी गुप्ता, २०२० मध्ये अक्षय ऊर्जा, २०२० मध्ये आशियातील सर्वात प्रभावशाली महिला म्हणून ओळखल्या गेल्या. डॉ. राशी गुप्ता यांनी बॅटरी व्यवस्थापन

प्रणालींवर एक मनोरंजक सत्र दिले- इलेक्ट्रिक वाहनांचे महत्त्व आणि त्यांचे प्रकार.


तिसरे सत्र इलेक्ट्रिक वाहनावर होते: श्री. प्रणद सेठ, वरिष्ठ व्यवस्थापक, प्रगत तंत्रज्ञान विकास, ईआरसी पुणे, टाटा मोटर्स लि. यांनी उदयोन्मुख ट्रेंडचे विहंगावलोकन बाजारात सातत्याने वाढ होत आहे. त्यांनी बाजारात उपलब्ध असलेल्या इलेक्ट्रिक वाहनांची उदाहरणे घेऊन ट्रेंड अधिक प्रभावीपणे समजावून सांगितले.





पुढचे सत्र लेव्हिकॉन इंडिया सिस्टीम्स प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक श्री. केदार नाडगौंडी यांचे होते. सौरऊर्जा व्यवस्थापन आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या क्षेत्रातील त्यांच्या १९ वर्षांच्या अनुभवामुळे हे सत्र खूप मनोरंजक आणि प्रेरणादायी बनले. 'सौर ऊर्जा प्रणालीद्वारे इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग' या विषयावरील त्यांचे सादरीकरण इच्छुक तांत्रिक व्यावसायिकांसाठी अनेक संधींचे अनावरण करते.




पाचव्या सत्राचे संचालन श्री विवेक चौधरी, स्टेशन कंट्रोलर, महा मेट्रो, नागपूर यांनी केले. श्री विवेक चौधरी हे VNIT नागपूर येथून पीएचडी करत आहेत. 'इलेक्ट्रिक वाहनात वापरल्या जाणाऱ्या लिथियम-आयन बॅटरीच्या थर्मल ॲनालिसिस' या विषयावरील त्यांच्या सादरीकरणाने ईव्ही बॅटरीच्या थर्मल पैलूंवरील शंकांचे निरसन केले. श्री. चौधरी यांनी वारंवार वापरल्या जाणाऱ्या बॅटरी आणि कूलिंगच्या पद्धती सांगितल्या.



मागील सत्रात आमचे माजी विद्यार्थी, Masstech Pvt Ltd चे संचालक संचालन श्री. अनुराग पाटील यांनी इलेक्ट्रिक वाहनाच्या चार्जिंग ऑपरेशनचे प्रात्यक्षिक दाखवले. त्यांनी चार्जिंगची प्रक्रिया समजावून सांगितली आणि सॉफ्टवेअरच्या पार्टचे ऑपरेशन ग्राहकाद्वारे टॅरिफ चेक आणि पेमेंट केले जाईल. चार्जिंगसाठी वापरलेले प्लग आणि मॉड्यूल स्पीकरद्वारे योग्यरित्या दर्शविले गेले, ज्यामुळे सत्र अधिक मनोरंजक बनले. प्रात्यक्षिक थेट असल्याने, विद्यार्थी त्यांच्या शंका प्रभावीपणे दूर करू शकले.



समापन सत्र परिषदेत आम्ही आमच्या तरुण पिढीला ई-पोस्टर स्पर्धा आणि आयडिया-पिचिंग स्पर्धा आयोजित करून त्यांची प्रतिभा आणि सर्जनशीलता दर्शविण्याची संधी दिली. दोन्ही स्पर्धांमध्ये महाराष्ट्रातील विविध पॉलिटेक्निकमधील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सहा प्रासंगिक आणि माहितीपूर्ण सत्रांनंतर, बक्षीस घोषणेचे सत्र झाले ज्यामध्ये दोन्ही स्पर्धांमधील विजेत्यांची घोषणा करण्यात आली आणि त्यांचा सत्कार करण्यात आला. आणि डॉ. उषा राघवन विभाग प्रमुख, माहिती तंत्रज्ञान यांनी २९ व्या राष्ट्रीय परिषदेची अधिकृत घोषणा केल्याने या परिषदेचा समारोप आयोजक सचिव श्रीमती आर.यू. पाटील, प्रभारी ईपीएस विभाग यांच्या हस्ते झाला.

परिषदेची Youtube लिंक : https://youtu.be/ew5CZkCj_TY

**इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स**




"Techno PRO 2022" ह्या राज्यस्तरीय प्रोजेक्ट स्पर्धेत इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्सच्या तृतीय वर्षातील साई दामोदर या विद्यार्थ्याला "Nulification of Vernier Caliper using AI Based Real Time object Measurement" या प्रकल्पाला प्रथम पारितोषिक मिळाले. सदर स्पर्धा MSBTE व ठाकूर पॉलीटेक्निक यांच्या संयुक्त विद्यमाने ७ मे २०२२ रोजी ठाकूर पॉलीटेक्निकमध्ये घेण्यात आली. या प्रकल्पाला इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्सच्या विभाग प्रमुख डॉ. सौ. कीर्ती आगाशे व श्री. मोहित रहाळकर (Analyte Controls) यांचे मार्गदर्शन लाभले.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे




५ एप्रिल : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी भारत सरकारच्या योग प्रमाणन मंडळ, आयुष मंत्रालय, द्वारे आयोजित केलेली परीक्षा यशस्वीरित्या पूर्ण केली व त्यांना योग शिष्टाचार प्रशिक्षक म्हणून प्रमाणित करण्यात आले.

१६ एप्रिल : प्रा. विभूती सावे यांनी २०१९-२१ तुकडीच्या एम.एम.एस. आणि पी.जी.डी.एम. विद्यार्थ्यांसाठी दीक्षांत समारंभ आयोजित केला.



१६ एप्रिल : विद्यार्थी विकास समिती आणि कर्मचारी विकास समितीने ब्रिम्सचे विद्यार्थी आणि कर्मचारी यांच्यासाठी अंतर्गत क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले.

**स्पर्धेचे विजेते :**

| खेळ | विद्यार्थी | कर्मचारी |
|---|---|---|
| कॅरम | यश मोहिते<br>प्रभाकर हेरेकर | सुभाष जगताप<br>चैतन्य पवार |
| बुद्धिबळ | प्रणव साळवी | -- |
| टेबल टेनिस | आयुष हर्या<br>शुभम गवई | स्वप्नील नाखवा |

१७ एप्रिल : डॉ. नीतिन जोशी यांना अंबिका योग कुटीर या संस्थे तर्फे योग महोत्सवाच्या निमित्ताने अतिथी वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले.









१९ एप्रिल : ए आय एम एस मुंबई चॅप्टरच्या वतीने, डॉ. व्ही. एन. ब्रिम्सने क्लस्टर मीटिंगचे आयोजन केले. सर्व भागधारकांच्या फायद्यासाठी व्यवस्थापन शिक्षण वर्धित करणाऱ्या योग्य कार्यक्रमाबाबत चर्चा करणे हा या बैठकीचा उद्देश होता. या बैठकीला डॉ. डी. वाय. पाटील, डॉ. अजित सिंग, डॉ. किरण यादव, डॉ. सी. बाबू, तसेच ए आय एम एस च्या इतर व्यवस्थापन संस्थांचे संचालक आणि प्रतिनिधी तर ब्रिम्स तर्फे डॉ. नीतिन जोशी, डॉ. पंकज नंदूरकर, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा, डॉ. कांचन अक्षय आणि प्रा. विभूती सावे उपस्थित होते.



२२ एप्रिल : बी एम ए च्या वतीने ब्रिम्सने ''वे अहेड पोस्ट द पॅनडमिक'' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले. या सत्राचे नियंत्रण डॉ. अरुण चितलांगिया यांनी केले, तर प्रमुख पाहुणे डॉ. गुरुप्रसाद मूर्ती होते. ब्रिम्सचे प्राध्यापक आणि बी एम ए चे सदस्य या चर्चासत्राला उपस्थित होते.



२५ एप्रिल : क्रीडा समितीच्या वतीने विप्रम च्या क्रीडा अकादमीने (व्हीपीएम स्पोर्ट्स अकॅडमी) आगामी ॲथलेटिक चॅलेंज स्पर्धेसाठी आयोजित केलेल्या बैठकीला डॉ. कांचन उपस्थित राहिल्या. ब्रिम्सने २९ एप्रिल ते १ मे या कालावधीत सूत्रसंचालन, व्यवस्था

आणि स्वयंसेवक उपलब्धता करून देऊन या कार्यक्रमास पाठिंबा दिला.

२८ एप्रिल : आयुष मंत्रालयातर्फे घोषित अग्रगण्य योग संस्था श्री अंबिका योग कुटीर या संस्थेतर्फे, १७ एप्रिल २०२२ रोजी विप्रमच्या प्रांगणात आयोजित 'योग महोत्सव-२०२२' च्या आयोजन समिती सदस्या म्हणून योगदानाबद्दल, डॉ. पल्लवी चंदवासकर यांचा सत्कार करण्यात आला.



२९ एप्रिल आणि १ मे : प्रा. संदीप मोघे यांनी विप्रमच्या क्रीडा अकादमी (व्हीपीएम स्पोर्ट्स अकॅडमी) च्या पहिल्या आंतरशालेय, महाविद्यालयीन आणि क्लब मैदानी खेळ संमेलना (ॲथलेटिक्स मीट)च्या उद्घाटन आणि समारोप समारंभाचे सूत्रसंचालन केले. हे संमेलन मुंबई विभागासाठी खुले होते ज्यात मुंबई शहर, मुंबई उपनगरे, पालघर, रायगड आणि ठाणे जिल्ह्याचा समावेश होता. येथे विविध वयोगटांसाठी एकूण १३६ स्पर्धा संपन्न झाल्या.






विप्रमच्या क्रीडा अकादमी (व्हीपीएम स्पोर्ट्स अकॅडमी) तर्फे टीचर्स वॉकिंग चॅलेंजचेही आयोजन करण्यात आले यामध्ये डॉ. नीतिन जोशी, डॉ. पंकज, डॉ. मीनाक्षी, डॉ. कांचन आणि प्रा. विभूती यांनी भाग घेतला आणि डॉ. जोशी यांनी चॅलेंजमध्ये सुवर्णपदक जिंकले.



३० एप्रिल: ब्रिम्सच्या इ-सेल आणि आय आय सी समिती तर्फे 'बिसनेस मॉडेल कॅनव्हास' या विषयावर, उद्योजक आणि पुरस्कारप्राप्त स्टार्टअप सल्लागार डॉ. नयन भेडा यांच्या ऑनलाइन अतिथी सत्राचे आयोजन करण्यात आले.




डॉ. नीतिन जोशी यांनी एअरबस कंपनीसाठी 'उत्कृष्टतेचा प्रवास आणि सर्जनशीलतेचे महत्त्व' या विषयावर एक व्याख्यान दिले.

•••

आयुष्यातल्या असंख्य समस्यांची फक्त दोनच कारणं असतात. एक तर आपण विचार न करता कृती करतो किंवा कृती करण्याऐवजी विचार करतो.

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

संग्रहालय एक महत्त्वाचे शैक्षणिक ठिकाण होय. पाश्चिमात्य देशांमध्ये प्रत्येक गावात एक चांगले संग्रहालय आणि एकतरी समृद्ध वाचनालय असते. या ठिकाणी पालक आपल्या मुलांना घेऊन येतात. शाळकरी मुलांसाठी या ठिकाणी विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. काही वाचनालये केवळ मुलांसाठी निर्माण करण्यात आली आहेत. दरवर्षी १८ मे ला जागतिक संग्रहालय दिवस साजरा करण्यात येतो. यावर्षी या तारखेच्या अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. मुंबई येथील नेहरू विज्ञान केंद्राने जागतिक संग्रहालय दिनाचे औचित्य साधून सर्वांसाठी आठवडाभर प्रवेश फी माफ केली होती.

भारतीय विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांसाठी विद्या प्रसारक मंडळ मागील वीस वर्षांपासून इंग्लंडची शैक्षणिक सहल आयोजित करीत आहे. या सहलीचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे वस्तुसंग्रहालय आणि वाचनालय यांना भेटी देणे हा होय. या शैक्षणिक सहलीत ऑक्सफर्ड, केंब्रिज आणि लंडन अशा तीन शहरांना भेटी देण्यात येतात. या तीनही शहरांत वस्तुसंग्रहालय तसेच वाचनालय यांची रेलचेल आहे. सगळ्या वस्तू अतिशय पद्धतशीरपणे लावून ठेवलेल्या आहेत. विशेष हे की, बऱ्याच ठिकाणी प्रवेश विनामूल्य आहे. आपण जर आधी सूचना देऊन गेलो तर ते आपल्यासाठी विशेष अभ्यास दौऱ्याचे आयोजन करतात. त्यामुळे आपल्या ज्ञानात चांगलीच भर पडते. आपल्याकडे मात्र याबाबतीत जरा निराशाजनक चित्र आहे. वस्तुसंग्रहालये तसेच वाचनालये यांची आपल्या देशातील संख्या फारशी नाही. जी आहे ती सुद्धा मोठ्या शहरात आढळते. त्याचा देखील वापर फार कमी केला जातो.

संग्रहालय भेटी संदर्भात एक अनुभव येथे सांगणे सयुक्तिक ठरेल. जपानच्या क्योटो सँगो विद्यापीठाचे विद्यार्थी दरवर्षी ठाण्याला भेट देतात. त्यांच्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यातील एक कार्यक्रम हा वस्तुसंग्रहालयाला भेट देण्याचा असतो. जपानी मुले आधीच माहिती काढून येतात. एका भेटीत आम्हाला भाऊ दाजी लाड संग्रहालय पाहायचे आहे असे सांगितले. त्यानुसार आम्ही नियोजन करू लागलो. तेव्हा असे लक्षात आले की, त्यांच्यासोबत असलेल्या आमच्याच महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हे संग्रहालय पाहिलेले नव्हते. जी मंडळी ठाण्यात लहानाची मोठी झाली त्यानी या संग्रहालयाला एकदाही भेट दिली नाही हे ऐकून पाहुण्यांना आश्चर्य वाटले. याला जबाबदार आपले पालकच आहेत. सुट्टीमध्ये ते मुलांना सहलीला नेतात. परंतु अशी महत्त्वाची ठिकाणे दाखवायला नेत नाहीत. ही दुःखाची बाब आहे. हे चित्र लवकरच बदलेल अशी आशा बाळगू या.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.